बातम्या, लेख व जाहिरातीसाठी
लातूर समाचार
समर्थनगर धाराशिव
मो.९४२२४७२५०२ व ९१७२३२५७०८

| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १७६ वा | शनिवार दिनांक २० सप्टेंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत १.५० ₹

RNI MAHMAR/2003/11649


# लातूर समाचार


प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)



प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकरभोजनासाठी
भेट द्या


## क्राईम न्युज

### धाराशिव पोलीसांची अवैध मद्य विरोधी

धाराशिव (प्रतिनिधी)- पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली काल गुरुवार दि.१८.०९.२०२५ रोजी अवैध मद्य विरोधी धाराशिव जिल्हयात पोलीस ठाणे हद्दीत ०९ कारवाया करण्यात आल्या. या छाप्यात घटनास्थळावर आढळलेले २१७ लिटर गावठी दारु, ३० लिटर सिंधी ताडी अम्ली द्रव व देशी विदेशी दारुच्या २१ सिलबंद बाटल्याअसे मद्य जप्त करण्यात आले. सदर जप्त मद्य यांची एकत्रीत किंमत अंदाजे २६,००० आहे. यावरुन महाराष्ट्र मद्य मनाई कायद्यांतर्गत संबंधीत पोलीस ठाण्यात ०९ गुन्हे खालीलप्रमाणे नोंदवण्यात आले आहेत.

१)उमरगा पो ठाणेच्या पथकाने ६ ठिकाणी छापे टाकले. आनंद रा.काळे प्लॉट उमरगा ता.उमरगा जि. धाराशिव हे ११.४५ वा. सु.पृताप कोथींबीरे यांचे घराचे शेजारी मोकळ्या जागेत प्रॉपर उमरगा शहरात अंदाजे ४,२०० किंमतीची ४० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. गोविंद रा. सेवानगर तांडा कदेर ता.उमरगा जि. धाराशिव हे सु. कदेर येथे सेवान-गर तांडा येथे अंदाजे १,६०० किंमतीची २० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. शिवाजी रा. कोळसुर क. ता.उमरगा जि. धाराशिव हे १२.३० वा. सु. वडर गल्लीत पाण्याच्या टाकी समोर कोळसुर येथे अंदाजे १,२०० किंमतीची १२ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळ-गलेली जप्त करण्यात आली. शिवाजी रा. धाकटीवाडी ता. उमरगा जि. धाराशिव हे १२.४५ वा. सु. आर टी ओ ऑफीस जवळ धाकटी वाडी शिवारामधील साई हॉटेलच्या बाजूस उमरगा येथे अंदाजे २,६०० किंमतीची २६ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. अनिल रा. एकोंडी ता.उमरगा जि. धाराशिव हे १२.४५ वा. सु.उमरगा ते एकोंडी जाणारे रोडच्या बाजूला श्रीकांत शिंदे यांचे शेतात अंदाजे २,४०० किंमतीची ३० लिटर सिंधी ताडी अम्ली द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळ-गलेले जप्त करण्यात आले.

सोजराबाई रा. तुरोरी ता. उमरगा जि. धाराशिव ह.मु. हिरवे यांचे खडी केंद्रासमोर कोरेगाववाडी ता. उमरगा जि. धाराशिव हे १६.४० वा. सु. कोरेगाववाडी शिवारातील हिरवे यांचे खडी केंद्रासमोर रोडलगत अंदाजे १,४०० किंमतीची १४ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळ-गलेली जप्त करण्यात आली.

परंडा पो ठाणेच्या पथकाने १ ठिकाणी छापा टाकला. रमेश रा.पिंपरखेड ता. परंडा जि. धाराशिव हे हॉटेल यशराज च्या बाजूला पत्राच्या शेडमध्ये पिंपरखेड येथे अंदाजे २,१०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या २१ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या.

३)ढोकी पो ठाणेच्या पथकाने २ ठिकाणी छापे टाकले. आरोपी नामे-संगिता नाना काळे, वय ५० वर्षे, रा.जयभवानी नगर पारधी पिडी ता. जि. धाराशिव या १६.३५ वा. सु.जयभवानी नगर पारधी पिडी येथे अंदाजे ७,००० किंमतीची ७० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली.

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी प्रशासनाने तत्परतेने मदत द्यावी - खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांची ठाम भूमिका



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- धाराशिव जिल्ह्यात मागील अनेक दिवसापासून मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी होत असून खरीप हंगामातील पिके धोक्यात आली आहेत या पार्श्वभूमीवर खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांनी आज तुळजापूर तालुक्यातील चिवरी येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर शेती पिकांचे नुकसान झाले असून शेतकरी हवालदिल झाले आहेत. या पार्श्वभूमीवर अतिवृष्टीग्रस्त भागाला भेट देऊन शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांची पाहणी करण्यात आली. यावेळी परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणात हजर होते

सलग झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे. पाहणीदरम्यान प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या की -शेती पिकांच्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ करून घ्यावेत. शेतकऱ्यांना योग्य नुकसानभरपाई मिळावी यासाठी त्वरीत कार्यवाही करावी. शासनाने ज्या निकषांनुसार मदत देणे अपेक्षित आहे, ते निकष शिथिल करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा.

शेतकरी हे आपल्या राष्ट्राचे कणखर आधारस्तंभ असून त्यांच्या घामाने सिंचन झालेल्या मातीतूनच महाराष्ट्राची भाकरी तयार होते. त्यामुळे अशा कठीण परिस्थितीत सरकारने तातडीने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहून मदतीचे हात पुढे करणे ही काळाची गरज असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## मुख्याधिकारी श्रीमती नीता अंधारे यांच्या हस्ते मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त धाराशिव नगरपरिषदेचे ध्वजारोहण



धाराशिव (शीला उंबरे-पेंढारकर):मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त धाराशिव नगर परिषद येथील प्रांगणात बुधवार (१७ सप्टेंबर) ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी श्रीमती नीता अंधारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

ध्वजारोहणानंतर मराठवाडा मुक्ती संग्रामातील हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले. या वेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मराठवाड्याच्या मुक्तीसाठी बलिदान दिलेल्या शहीदांना स्मरण करून त्यांना आदरांजली वाहिली.

नगरपरिषदेमार्फत झालेल्या या ध्वजारोहण कार्यक्रमामुळे स्वातंत्र्य संग्रामातील मराठवाड्याच्या ऐतिहासिक लढ्याची आठवण पुन्हा एकदा ताजी झाली.

या प्रसंगी कार्यालयीन अधीक्षक दीपक तावडे, रावसाहेब शिंगाडे, बांधकाम अभियंता वैजनाथ दृकर, प्रदीप स्वामी, सहाय्यक अभियंता सानप, पाणीपुरवठा अभियंता संग्राम भापकर, लेखपाल जयश्री पाटील, दीपक गवळी,राजकुमार शिंदे,भारत साळुंखे, रोहित मुंडे विद्युत अभियंता, स्वच्छता अभियंता महेर, पिंटू गायकवाड यांच्यासह नगरपरिषदेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ ऑनलाईन नोंदणीसाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत

धाराशिव, (जिमाका) जागतिक कौशल्य स्पर्धा ही जगातील सर्वात मोठी व्यावसायिक शिक्षण व कौशल्य उत्कृष्टता स्पर्धा असून ती दर दोन वर्षांनी आयोजित केली जाते.या स्पर्धेला 'ऑलिम्पिक ऑफ स्किल्स' असेही संबोधले जाते.यापूर्वीच्या ४७ व्या स्पर्धेत ५० देशांतील १० हजारांहून अधिक उमेदवार सहभागी झाले होते.

आगामी ४८ वी जागतिक कौशल्य स्पर्धा २२ ते २७ सप्टेंबर २०२६ दरम्यान शांघाय (चीन) येथे होणार आहे. त्याअनुषंगाने जिल्हा,विभाग,राज्य व देशपातळीवर निवड स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. इच्छुक उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत करणे आवश्यक आहे.नोंदणीसाठी उमेदवारांनी https://www.skillindiadigital.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.निवड झालेल्या उमेदवारांची नावे जागतिक पातळीवर नामांकनासाठी पाठविली जाणार आहेत.

सहभागासाठी उमेदवारांचा जन्म १ जानेवारी २००४ किंवा त्यानंतरचा असणे आवश्यक आहे. तर Digital Construction, Cloud Computing, Additive Manufacturing, Cyber Security, Mechatronics, Aircraft Maintenance इत्यादी काही विशेष क्षेत्रांसाठी जन्मतारीख १ जानेवारी २००१ किंवा त्यानंतरची असणे आवश्यक आहे.

या स्पर्धेसाठी ITI,पॉलिटेक्निक, अभियांत्रिकी महाविद्यालये,महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ,खासगी कौशल्य विद्यापीठे,MSME Tool Rooms,Fine Art Colleges, प्रशिक्षण संस्था इत्यादींमधील विद्यार्थी पात्र आहेत.

जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेऊन ऑनलाईन नोंदणी करावी,असे आवाहन सहाय्यक आयुक्त,कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,धाराशिव यांनी केले आहे.

## स्वस्थ नारी,सशक्त परिवार अभियानाचा जिल्ह्यात शुभारंभ

धाराशिव, (जिमाका) महिलांचे आरोग्य आणि सक्षमीकरण हे कुटुंब,समाज व देशाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.या उद्देशाने आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत स्वस्थ नारी, सशक्त परिवार हे विशेष राष्ट्रीय अभियान दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ दरम्यान देशभर राबविण्यात येत आहे.

या अभियानाचा राष्ट्रीय शुभारंभ इंदूर येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाला. राज्यस्तरीय कार्यक्रम मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये राज्यपाल, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार,आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे,वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रिफ आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

जिल्हास्तरीय कार्यक्रम धाराशिव येथील शासकीय रुग्णालयात आयोजित करण्यात आला.यावेळी जिल्ह्याचे मान्यवर लोकप्रतिनिधी,वैद्यकीय अधिष्ठाता डॉ.शैलेंद्र चौव्हाण,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतिष हरिदास,जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकुरकर उपस्थित होते.पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी उपकेंद्र उपळा येथे भेट देऊन आरोग्य सेवांची तयारी व औषधसाठ्याचा आढावा घेतला. जिल्ह्यात एकूण २५६ ठिकाणी आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात आली. आजपर्यंत १५ आरोग्य संस्थांमध्ये शिबिरांचे आयोजन केले. ४४ प्राथमिक आरोग्य केंद्रे,२ शहरी आरोग्य केंद्रे,२७ आयुष्मान आरोग्य मंदिर,६ ग्रामीण व ६ उपजिल्हा रुग्णालये,१ सामान्य व १ स्त्री रुग्णालय,तसेच वैद्यकीय महाविद्यालयात आरोग्य सेवा उपलब्ध आहे.

अभियानाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.महिला व मुलांच्या आरोग्य तपासण्या व जनजागृती.उच्च रक्तदाब, मधुमेह,कर्करोग व क्षयरोग तपासणी. गर्भवतींसाठी -छउ तपासणी,बालकांचे लसीकरण.आयुष उपचारपद्धतींचा लाभ. किशोरवयीन मुलींसाठी पोषण व मासिक पाळी स्वच्छतेबाबत जागृती.रक्तदान शिबिरांचे आयोजन (१ ऑक्टोबर - राष्ट्रीय रक्तदान दिन) आयुष्मान भारत कार्ड, झचग-ध नोंदणी व वितरण.क्षयरोग निर्मूलनासाठी निक्षय मित्र उपक्रमांतर्गत सहभाग. तपासणी शिबिरांमध्ये निदान झालेल्या रुग्णांना आवश्यक त्या तपासण्या व शस्त्रक्रिया मोफत उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

## शेतकऱ्यांच्या मदतीसाठी 'महाविस्तार AI' ॲप लाँच

धाराशिव (जिमाका):-हवामान बदल,बाजारपेठेतील अस्थिरता आणि माहितीच्या अभावामुळे शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या आव्हानांवर मात करण्यासाठी कृषी विभागाने 'महाविस्तार AI' हे अत्याधुनिक मोबाईल ॲप लाँच केले आहे.

हे ॲप शेतकऱ्यांना मराठीत रिअल-टाइम माहिती,तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि आधुनिक शेती पद्धतींचे प्रशिक्षण एका ठिकाणी उपलब्ध करून देते.

**ॲपची वैशिष्ट्ये –** स्थानिक पातळीवरील रिअल-टाइम हवामान अंदाज.स्थानिक व राष्ट्रीय बाजारपेठेतील पिकांचे भाव. कृषी योजनांची माहिती.अनुदान,कर्जमाफी विमा योजना व्हिडिओच्या माध्यमातून पेरणी,कापणी,खतांचा वापर,जैविक शेतीबाबत मार्गदर्शन

AI चॅटबॉट : शेतकऱ्यांच्या प्रश्नांना त्वरित उत्तरे.रोग व कीड निदान : पिकांचे फोटो अपलोड करून उपाययोजना.या ॲपमुळे शेतकऱ्यांचा वेळ वाचतो,उत्पादन खर्च कमी होतो तसेच बाजार भाव व हवामान अंदाजामुळे योग्य नियोजन करून उत्पन्न वाढविण्याची संधी मिळते.

आजच गुगल प्ले स्टोअरवरून महाविस्तार AI ॲप डाउनलोड करा आणि डिजिटल शेती क्रांतीचा भाग बना.

असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय,धाराशिव यांनी केले आहे.

## नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत: २१ सप्टेंबरला पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान चाचणी

धाराशिव,दि.१९,(जिमाका):- जि.प.शिक्षणाधिकारी कार्यालय केंद्र शासन पुरस्कृत नवभारत साक्षरता कार्यक्रम महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत राज्यभर राबविला जात आहे.सन २०११ च्या जनगणनेनुसार देशातील १५ वर्षांवरील २५.७६ कोटी निरक्षरांना २०३० पर्यंत पायाभूत साक्षर करण्याचा या योजनेचा उद्देश आहे.

या कार्यक्रमांतर्गत पाच घटकांवर भर दिला आहे.पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान.महत्वपूर्ण जीवन कौशल्य. व्यावसायिक कौशल्य विकास.मूलभूत शिक्षण व निरंतर शिक्षण या कार्यक्रमाची अंमलबजावणी शालेय विद्यार्थ्यांच्या स्वयंसेवकांच्या माध्यमातून होत आहे.विद्यार्थी आपल्या कुटुंबातील अथवा शेजारील निरक्षर व्यक्तींना साक्षर करण्यासाठी मदत करतात. योजनेच्या अनुषंगाने पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी ही परीक्षा २१ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते सायं.५ या वेळेत जिल्ह्यातील नोंदणी झालेल्या शाळांमध्ये घेण्यात येणार आहे. जिल्ह्यात एकूण ११ हजार ४२५ निरक्षर परीक्षेस बसणार असून त्यात स्त्री : ६८५४,पुरुष : ४५६८ व तृतीयपंथी ३,माध्यमानुसार मराठीचे ११ हजार २२५,उर्दूचे २०० असे एकूण ११ हजार ४३५ जणांचा समावेश आहे.

ज्यांची अद्याप उल्लास ॲपवर नोंदणी झालेली नाही,त्यांनी परीक्षेच्या दिवशी नोंदणी करूनही परीक्षा देता येईल.त्यामुळे जास्तीत जास्त निरक्षरांनी या चाचणीत सहभागी व्हावे,असे आवाहन शिक्षणाधिकारी (योजना), जिल्हा परिषद धाराशिव यांनी केले आहे.

## धाराशिव येथे भव्य दुर्गा दांडिया महोत्सवाचे आयोजन

धाराशिव(प्रतिनिधी)-नवरात्र महोत्सवानिमित्त धाराशिव येथे भव्य दुर्गा दांडिया महोत्सवाचे दि. २५ सप्टेंबर रोजी दुपारी ४ ते रात्री ९ या वेळेत आयोजन करण्यात आले आहे. शिवसेना (शिंदे) शहरप्रमुख आकाश मिलिंदराव कोकाटे यांच्या वतीने महिला व मुलींसाठी आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवात आकर्षक बक्षिसांची लयलूट करण्याची संधी असून सहभागी स्पर्धकांना देखील भेटवस्तू देण्यात येणार आहेत. या स्पर्धेत महिला, मुलींनी नोंदणी करून सहभागी व्हावे असे आवाहन आयोजक आकाश कोकाटे यांनी केले आहे. धाराशिव शहरातील पुष्पक मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या दांडिया महोत्सवाचे अभिनेत्री शिवानी कांबळे व आयली घीया हे खास आकर्षण आहेत. स्पर्धेत ग्रुप डान्ससाठी प्रथम पारितोषिक २१ हजार रूपये, द्वितीय १५ हजार आणि तृतीय ७ हजार रुपयांचे पारितोषिक ठेवण्यात आलेले आहे. तर युगल डान्ससाठी प्रथम ५००१, द्वितीय ३००१ आण तृतीय १००१ रूपयांचे पारितोषिक ठेवण्यात आलेले आहे. त्याचबरोबर सहभागी होणार्या महिला वर्गातून एका महिलेस लकी ड्रॉद्वारे पैठणी जिंकण्याची संधी असून प्रत्येक सहभागी महिलेला आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार आहे. त्याकरिता आयोजकांकडून कुपन घेणे आवश्यक आहे. स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क एक हजार रूपये ठेवण्यात आलेले आहे. ही स्पर्धा केवळ महिला व मुलींसाठी असून मर्यादित नावनोंदणी आहे.

त्यामुळे इच्छुक महिला व मुलींनी तात्काळ नोंदणी करावी. नोंदणीसाठी ९५०३९९०७६६ व ९५१८९९४६०३ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आयोजक तथा शिवसेना शहरप्रमुख आकाश मिलिंदराव कोकाटे यांनी कळविले आहे.

## सलग झालेल्या पावसामुळे मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान- खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- बेंबळी व केशेगाव ता. धाराशिव येथे अतिवृष्टीग्रस्त भागाला भेट देऊन शेतकऱ्यांच्या शेती पिकांची पाहणी केली. सलग झालेल्या पावसामुळे मोठ्या प्रमाणावर उभ्या पिकांचे नुकसान झाले असून शेतकरी हवालदिल झाले आहेत या पाहणीदरम्यान प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर दिल्या आहेत. पाहाणी नंतर खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर म्हणाले की, शेती पिकांचे नुकसानग्रस्त क्षेत्राचे पंचनामे तात्काळ करून घ्यावेत.

शेतकऱ्यांना योग्य नुकसान भरपाई मिळावी यासाठी त्वरीत कारवाई करावी. शासनाने ज्या निकषांनुसार मदत देणे अपेक्षित आहे ते निकष शिथिल करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा.

शेतकरी हे आपल्या राष्ट्राचे कणखर आधारस्तंभ आहेत. त्यांच्या घामाने सिंचन झालेल्या मातीतूनच महाराष्ट्राची भाकरी तयार होते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकारने तात्काळ उभे राहून मदतीचे हात पुढे करणे ही काळाची गरज आहे.

यावेळी बेंबळी व केशेगाव येथील शिवसेना कक्ष जिल्हाप्रमुख मोईन खाँन, ग्रामपंचायत सदस्य राजाभाऊ नळेगावकर, हाशमोद्दीन श्रीकर, सरपंच सुरज चव्हाण, मिनाज श्रीकर, सुरेश शिंदे यादीसह उपस्थीत होते.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## पावसाने केले मोठे नुकसान

राज्यात पावसाने मोठे नुकसान केले आहे. अनेक वर्षापासून पाऊस काळ कमी होत होता. यावर्षी अचनाक क्षमतेपेक्षा अधिक झाला. अनेक जे भविष्यवाणी करतात त्यांचा सुद्धा अंदाज या निसर्गाने चुकविला आहे. सर्वाधिक पाऊस झाल्याने नदी, नाले, ओढे, पाटबंणारे भरून वाहात आहेत. बंधारेचे दरवाजे उघडले आहे. क्षमतेपेक्षा अधिक पाऊस झाल्याने अनेक नदी काढच्या नागरिकांना सावधतेचा इशारा दिला आहे. अनेक जिल्ह्यात पावसाच्या भीतीने शाळांना सुट्टी जाहिर केली होती. यापुर्वी असे कधी झाले नव्हते, असे यावर्षी पावसाने पाणी संकट निर्माण केले आहे. ऑगस्ट महिन्यात मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे १,२६५ गावे बाधित झाली असून १६ लाख ८ हजार ३०१ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. सप्टेंबरमध्ये १३ तारखेपासून आजपर्यंत ५ लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. दरम्यान, आतापर्यंत ऑगस्ट महिन्यातील १५ लाख ५४३ हेक्टरवरील नुकसानीचे पंचनामे पूर्ण झाले असून सप्टेंबर महिन्यातील नुकसानीचे पंचनामे दोन दिवसांत सुरू होणार असल्याची माहिती विभागीय आयुक्तालयातील सूत्रांनी दिली. यंदा विभागातील अनेक मंडळांत अतिवृष्टी तर काही ठिकाणी ढगफुटीसदृश परिस्थिती निर्माण झाली. ऑगस्टमध्ये अतिवृष्टीमुळे मराठवाड्यातील ४ हजार २५१ गावांतील १९ लाख ७० हजार ४२२ शेतकरी बाधित झाले असून त्यांचे जवळपास १६ लाख ८ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. अतिवृष्टीमुळे ५९ व्यक्तींचा मृत्यू झाला तर ४३ जण जखमी झाले. आतापर्यंत ५३२ जनावरे मृत्युमुखी पडली असून त्यामध्ये मोठी जनावरे ४३२, तर लहान जनावरे ९९ इतकी आहेत. याशिवाय २१६ कुक्कुटपालनातील पक्ष्यांचा मृत्यू झाला आहे. ४१६ घरे पूर्णपणे पडली, तर ४१३३ घरे नुकसानग्रस्त झाली आहेत. १३२ झोपड्या कोसळल्या असून २४६ झोपड्या बाधित झाल्या आहेत. काही गावातून नागरिक पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले आहेत. संकटे अधिक निर्माण झाली तरी यावर मात करण्यासाठी प्रशासन सरसावले आहे. महावितरणचा वीज प्रवाह खंडीत झाल्याने अनेक गावे आंधारात आहेत. अशा स्थितीत सरकारी कामाची गुणवत्ता पावसाने उघडी पाडली आहे. सरकारकडून मंत्रीगण मतदार संघात फिरत आहेत. लोकांना धीर देत आहेत. विरोधी पक्षाने तर ओला दुष्काळ जाहिर करावा अशी मागणी केली आहे. पावसाने कहर केला आहे हे मान्यच केले पाहिजे. पाऊस यावर्षी जोतिषाला सुद्धा खोटे ठरविला आहे. पावसाने कहर केला असला तरी यापुर्वी कधी नाही एवढा पाऊस झाला असल्याने अनेकजन कधी पाऊस थांबेल याची वाट पाहात आहे. खरीपाचे पीक हातून गेले आहे. अजूनही सोयाबिनच्या शेतात पाणी गुडघ्यावर आहे. अनेकांचे सोयाबिन काढणीस आले असताना राणांत पाणी साचले आहे. या पाण्याचा निचरा कसा होईल याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. मुळात निसर्गाचे हे रुद्ररूप मानवाच्या चुकीमुळे झाले की काय असे वाटत आहे. बेसुमार वृक्ष तोड व काँक्रेटची जंगले पाहाता निसर्गाचा समतोल राहीला नाही. निसर्ग कोपला जात आहे. तरी माणूस स्वार्थापायी वृक्षतोड करीत आहे. वृक्षाचे अनेक फायदे आहेत. एक तर झाडामुळे मुळा पाणी शोषन घेतात. त्याच प्रमाणे दरड कोसळण्यासारखे प्रकार रोखता येतात. सध्याला दरडी कोसळणे किंवा नद्यास पुर येण्याचे कारण म्हणजे झाडी कमी आहे. त्याच प्रमाणे जे काही रस्त्याचे किंवा पुलाचे काम झाले त्याची गुणवत्ता उघडी पडलीच आहे. रस्ते व पुल वाहून गेले आहेत. त्यामुळे याचे पुर्नबांधणीसाठी बराच खर्च सरकारला करावा लागेल. शेतकऱ्यास मदत मोठ्या प्रमाणात करावी लागेल. पावसाने झालेल्या नुकसानीची भरपाई कशी करणार? कारण सध्याला पंचनामे चालू आहेत. वास्तविक किती शेतीचे नुकसान झाले. सातबारे ऑनलाईन संगणकावर दाखविले जातात. गावातील ग्रामसेवक किंवा तलाठी यांना गावातील शेतीची किती नुकसान किती झाले याची कल्पना येतेच. दररोजच शेतजमीनीची त्यांना माहिती असते. राज्यातील कृषी विभाग हा सतर्क आहे. त्यांना माहिती आहे की, शेतीचे किती नुकसान झाले. अधिक पाऊस झाला आहे. शेतात पाणी आहे. सोयाबिन पाण्यात आहे. राणात पाणीच पाणी आहे. पिके हाती लागणार नाही. कडक उन्हाची गरज आहे. पाण्याचा निचरा होण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे जवळपास राज्यातील शेतीत खरीपाचे पीक हाताचे गेले आहेत. त्यांना शासनाने मदत केली पाहिजे. तरच रब्बीसाठी शेतकरी काही प्रयत्न करू शकतील. रब्बीसुद्धा हाती लागेल याचा भरोशा नाही. राणात पाणीच पाणी आहे. या बाबत सरकारने जाणून घेतले पाहिजे. जी काही मदत देणे आहे ती मदत प्रत्येक शेतकऱ्याच्या खात्यात जमा केली पाहिजे. पंचनामे हा केवळ देखावा नसावा, कारण नुकसान किती झाले तर अत्याधुनिक यंत्रणेद्वारे माहिती मिळू शकते. सॅटेलाईटच्या माध्यमातून आता विस्तृत माहिती घेता येते. त्यामुळे पंचनामे हा फार्स म्हणजे देखावा करण्यापेक्षा अधिकाधिक शेतकऱ्यास मदत करणे काळाची गरज आहे. तीही तातडीने केली पाहिजे. कारण रब्बीसाठी वेगळी मदत करणे अपेक्षित आहे. सध्याला दसरा व दिवाळी सण मोठे आहेत. हे सण शेतकऱ्यानी आनंदाने साजरा करण्यासाठी त्यांना आर्थिक मदतीची गरज आहे. पंचनामे होत राहातील. मदतीचा आकडा जाहिर करून काही तरी ॲडव्हांस मदत खात्यात जमा करणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे शेतातील पाण्याचा निचरा कसा होईल या बाबत ज्ञान मिळाणे आवश्यक आहे. मुळात सोयाबिन असो किंवा अन्य फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे हे सर्वांनी मान्य केले आहे. त्यामुळे सरकारी मदतीशिवाय शेतकरी पुन्हा उभारी घेऊ शकत नाहीत. ही बाब लक्षात घेता तातडीने अधिक चौकशीच्या खोलात न जाता मदतीची गरज आहे त्याची पुर्तता केली पाहिजे.

# मनावर घेतले तर निश्चितपणे बदल घडू शकतो हे रमेशआप्पांच्या माध्यमातून जनतेने दाखवून दिले

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान शुभारंभ प्रसंगी पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले

**लातूर/प्रतिनिधी :** कोणतेही अभियान राबवण्याची ताकद जनतेत आहे मनावर घेतले तर बदल घडू शकतो हे जनतेनी रमेशआप्पांच्या माध्यमातून पंधरा वर्षाचा बदल घडून दाखवला तेव्हा गावच्या सर्वांगीण विकासासाठी आणि प्रगतीसाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान यशस्वीपणे राबवून निवळी ग्रामस्थांनी पहिल्या क्रमांकाचे पाच कोटींचे बक्षीस जिंकण्याचे लक्ष ठेवून प्रयत्न करावेत असे आव्हान जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले.

राज्य शासनाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान जिल्हास्तरीय शुभारंभ आणि निवळी येथील नव्याने बांधण्यात आलेल्या ग्रामपंचायत इमारतीचा लोकार्पण सोहळा पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या शुभहस्ते लातूर तालुक्यातील मौजे निवळी येथे बुधवारी सकाळी करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड होते याप्रसंगी जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर घुगे, जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, मनपा आयुक्त श्रीमती मानसी मीना, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे, तहसीलदार सौदागर तांदळे, गट विकास अधिकारी श्याम गोडभरले यांच्यासह भाजपाचे विक्रमकाका शिंदे, भागवत सोट, नवनाथ भोसले, सतीश आंबेकर, सुरज शिंदे, प्रताप पाटील, विजय काळे, बन्सी भिसे सरपंच अभयकुमार सोनपेठकर यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी ग्रामस्थ भाजपाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान या राज्यस्तरीय योजनेचा शुभारंभ छत्रपती संभाजीनगर येथे राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते व ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे व इतर अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत झाला या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण उपस्थितांना दाखवण्यात आले.

आजचा १७ सप्टेंबर हा दिवस अत्यंत अभिमानाचा असून देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १३ महिन्यांनी निजामाच्या राजवटीतून मराठवाडा विभाग मुक्त झाला. या लढ्यात अनेकांनी बलिदान दिले, त्याग केला, संकट झेलले याची आठवण कायम ठेवली पाहिजे. त्याचबरोबर तिसरी अर्थव्यवस्था निर्माण करून जगात देशाची वेगळी प्रतिमा निर्माण करणारे प्रधानमंत्री श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या जन्म दिनानिमित्ताने देशाची धुरा कायम त्यांच्याकडे राहावी अशा सदिच्छा देऊन यावेळी बोलताना पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले म्हणाले की, केंद्र आणि राज्य शासनाच्या सर्व योजनांची प्रभावीपणे आणि स्पर्धात्मक अंमलबजावणी व्हावी यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान सुरू करण्यात आले असून या अभियानात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले.

लातूर ग्रामीण मतदार संघाकडे आणि आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे विशेष लक्ष आहे त्यामुळे या मतदार संघाच्या विकासाला निश्चितपणे गती मिळाल्याशिवाय राहणार नाही. लातूर बार्शी रस्त्याचे काम मुदतीपूर्व पूर्ण करण्याचा प्रयत्न असून सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत रखडलेले प्रकल्प नजीकच्या काळात शंभर टक्के पूर्णतः घेऊन जाणार असल्याची ग्वाही देऊन पालकमंत्री राजे भोसले म्हणाले की, सर्वत्र प्रचंड पाऊस झाला आहे अतिवृष्टी होऊन नद्या नाल्यांना पूर आले, पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले काही ठिकाणी शेती वाहून गेली घरांची पडझड झाली नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्याचे काम निश्चितपणे करू असेही राजे भोसले यांनी बोलून दाखवले.

यावेळी बोलताना लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड म्हणाले की, देशात विकास पुरुष म्हणून नरेंद्र मोदी यांची तर राज्यात लाडके भाऊ म्हणून देवाभाऊजी ओळख निर्माण झाली आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजना ग्रामीण भागाला दिशा देणाऱ्या असून गावागावात प्रभावीपणे राबवाव्यात. निवळी गावच्या विकासासाठी राज्य शासनाच्या विविध विभागामार्फत निळकंठेश्वर देवस्थान सह विविध विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी मिळवून दिला असल्याचे सांगून मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान यशस्वीपणे राबवून स्पर्धेत उतरावे आणि निवळी ग्रामपंचायतीने राज्य पातळीपर्यंत मजल गाठावी. गेल्या काही दिवसापासून होत असलेल्या पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले असून शेतात पाणी घरात पाणी जिकडे तिकडे पाणीच पाणी झाले आहे सर्व शिवार बाधीत झाले असून सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना आधार देण्याचे काम करावे अशी मागणी त्यांनी केली.



जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना यांनी अभियान बाबतची सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाच्या प्रस्ताविकातून सुरज शिंदे यांनी गावातील विविध विकास कामांची माहिती देऊन अडीअडचणी मांडल्या. सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले या कार्यक्रमास निवळी आणि परिसरातील नागरिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करा

### माजी मंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी जिल्हा नियोजन समिती बैठकीत केली मागणी




**निलंगा/आयुब बागवान :** लातूर जिल्हा नियोजन समितीची महत्त्वपूर्ण बैठक राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. यावेळी जिल्ह्यातील पूरस्थिती व सुरू असलेल्या विविध कामांचा आढावा घेण्यात आला.

या बैठकीत जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासोबतच जनतेच्या ज्वलंत प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्ह्यात गेल्या काही दिवसांमध्ये झालेल्या मुसळधार पावसाने सर्वत्र पूरस्थिती निर्माण झाली आहे. यावेळी नागरिकांचे विशेषतः शेतकरी बांधवांचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. पायाभूत सुविधा देखील ठिकठिकाणी क्षतिग्रस्त झाल्या आहेत. लातूरच्या इतिहासात पहिल्यांदा इतक्या मोठा प्रमाणावर पाऊस झाला आहे. त्यामुळे सरकारने लातूर जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा, यासाठी मंत्री महोदयांनी स्वतः प्रयत्न करावेत, अशी मागणी केली.

यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, लातूरचे खासदार डॉ. शिवाजीराव काळगे, धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर, माजी मंत्री आमदर अमित विलासराव देशमुख माजी मंत्री आमदार संजय बनसोडे, लातूर ग्रामीणचे आमदर रमेशअप्पा कराड, , आमदर अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी वर्षाताई घुगे-ठाकूर तसेच सर्व विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# वीजग्राहकांचे समाधान हे महावितरणच्या अभियंत्यांचे कर्तव्य अन् परमार्थ; राष्ट्रीय अभियंता दिन उत्साहात

**मुंबई/प्रतिनिधी :** मूलभूत गरज बनलेल्या वीजक्षेत्रामध्ये महावितरण अभियंत्यांच्या कामगिरीचा उज्ज्वल व ऐतिहासिक वारसा आहे. राज्याच्या प्रगतीमध्ये योगदान देण्यासह अंधारलेल्या वाटा, घरे प्रकाशाने उजळण्याचे भाग्य महावितरणचे अभियंत्यांना मिळाले आहे. वीजजोडणीद्वारे विजेचा लखलखाट झाल्यावर घरगुती, शेतकरी, औद्योगिक, व्यावसायिक व इतर ग्राहकांच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीला सुरवात होते. या सेवेचा ग्राहकांना जो आनंद व समाधान मिळतो तोच खरा परमार्थ आहे आणि ग्राहकांना कायम समाधान देणारी सेवा देणे आपले कर्तव्य आहे असे मार्गदर्शन महावितरणच्या संचालकांनी मनोगतांमधून केले.

भारतरत्न डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंती निमित्ताने महावितरणच्या प्रकाशगड मुख्यालयात गुरुवारी (दि. १८) राष्ट्रीय अभियंता दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून संचालक श्री. सचिन तालेवार (प्रकल्प/संचालन), श्री. राजेंद्र पवार (मानव संसाधन), सहव्यवस्थापकीय संचालक श्री. दिलीप जगदाळे (कोकण विभाग), कार्यकारी संचालक सर्वश्री प्रसाद रेशमे, धनंजय औंढेकर, परेश भागवत, भुजंग खंदारे, दत्तात्रेय पडळकर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

संचालक श्री. सचिन तालेवार म्हणाले, महावितरणचे अभियंते व कर्मचाऱ्यांनी डोंगरदऱ्या, अतिदुर्गम भागात वीजयंत्रणा उभारून राज्याच्या प्रगतीला वेग दिला आहे. वीजग्राहकांशी प्रकाशाचे नाते जोडले आहे. हे नाते ग्राहकसेवेतून भक्कम व अतूट राहावे यासाठी सामाजिक जबाबदारीच्या जाणीवेने अभियंता म्हणून कार्यरत राहावे.



**महावितरणच्या प्रकाशगड मुख्यालयात राष्ट्रीय अभियंता दिनाच्या कार्यक्रमात भारतरत्न डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी संचालक श्री. सचिन तालेवार व श्री. राजेंद्र पवार, सहव्यवस्थापकीय संचालक श्री. दिलीप जगदाळे (कोकण विभाग) यांची प्रमुख उपस्थिती होती.**

संचालक श्री. राजेंद्र पवार म्हणाले, कोणत्याही व्यक्तीचा किंवा प्रदेशाचा सामाजिक व आर्थिक विकास हा विजेअभावी शक्य नाही. वीज क्षेत्र अनन्यसाधारण महत्वाचे आहे. या क्षेत्रात काम करताना कंपनीहित व ग्राहकहितासाठी योगदान देत राहणे, ही आपली महत्वाची जबाबदारी आहे. अत्यंत प्रतिकूल व खडतर परिस्थितीत महावितरणचे अभियंते व कर्मचारी वीज सेवा देण्यासाठी ज्या धैर्याने, गतीने, सांघिकतेने काम करतात त्याचाही राज्यात नावलौकिक आहे.

सहव्यवस्थापकीय संचालक श्री. दिलीप जगदाळे म्हणाले, अभियंत्याचा वारसा हा प्राचीन काळातील विश्वकर्मा यांच्यापासून ते डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्यापर्यंतचा आहे. नव तंत्रज्ञानातून हा वारसा सध्याच्या अभियंता पिढीकडूनही आणखी समृद्ध होत आहे. यावेळी कार्यकारी संचालक सर्वश्री प्रसाद रेशमे, धनंजय औंढेकर, परेश भागवत, भुजंग खंदारे, दत्तात्रेय पडळकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पाटणी यांनी केले व आभार मानले. कार्यक्रमाला क्षेत्रीय मुख्य अभियंते, अधीक्षक अभियंते तसेच मुख्यालयातील अभियंते, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# नवरात्रीच्या उपवासासाठी अचूक प्रमाणातील भाजणी




आता नवरात्राचे सर्वांना वेध लागले आहेत. घराघरातून साफसफाई, मंदिरात सजावट, रंगकाम, स्वच्छता करणे अशी धामधूम सुरु आहे. तर महिला एकीकडे घराचीदररोजची कामे तर सुरु आहेतच पण दुसरीकडे घराची स्वच्छता, सजावट, नवरात्रात घालायचे दागिने,साड्या पाहून त्याची तयारी, दांडिया गरबा यांची तयारी आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे नवरात्रीतील खाण्यापिण्याच्या गोष्टींची पूर्वतयारी करणे यात इतक्या बिझी झाल्या आहेत की जणू साक्षात अष्टभुजाच अवतरल्यासारखे वाटते. वेळ ,दिवस पुरत नाहीत . यातील खाण्याच्या पूर्वतयारी मधील आज आपण एक गोष्ट बनवून ठेवू. बऱ्याच महिलांचे ,पुरुषाचे सुद्धा नऊ दिवस उपवास असतात. फराळाचे विविध पदार्थ बनवले जातात. छान पोट भरणारी खमंग भाजणीची थालीपीठे, दशमी, धिरडे दमदार असतात त्यामुळे सर्वांनांच आवडतात. त्यासाठी जी भाजणी लागते ती आधी बनवून ठेवावी लागते. चला मग लगेंच सुरु करू.

**साहित्य :**

१ किलो भाजणी बनवण्यासाठी आपल्याला १ वाटी साबुदाणा, १ वाटी राजगिरा, दीड वाटी भगर, १ चमचा जिरे.

**कृती :**

थम गॅसवर कढई ठेवून त्यात साबुदाणा मध्यम आचेवर लाही होईपर्यंत ४..५ मिनिटे भाजावा . लाही होऊन साबुदाणा हलका आणि पांढराशुभ्र होतो मग २ मिनिटे भाजवा म्हणजे तो व्यवस्थित भाजला गेला आहे असे समजावे.नंतर तो खाली काढून मंद आचेवर राजगिरा भाजण्यास घ्यावा. तो मात्र मंद आचेवरच भाजावा कारण त्याच्या लाह्या होताना खुप तडतडतात त्यामुळे काळजी घ्यावी. राजगिरा मात्र थोडा थोडा ३..४ वेळा भाजावा म्हणजे लाह्या छान होऊन मस्त खमंग भाजला जातो. त्यानंतर भगर म्हणजेच वरई भाजायला घ्यावी. ही मंद आचेवरच शक्यतो भाजावी. अगदी थोड्यावेळच भाजावी. जास्त लाल भाजू नये. नाहीतर कडवटपणा येऊ शकतो. मग त्याच गरम कढईत जिरे घालून किंचीत गरम करावेत. स्वाद आला की गॅस बंद करून खाली काढावेत. मग सर्व छान एकत्र करून मिक्सर मधून इजडम बारीक फिरवावे. नंतर चाळणीने चाळून ती थंड झाली की घट्ट झाकणाच्या डब्यात भरून ठेवावी. आयत्या वेळी याची थालीपीठे, धिरडे,पुऱ्या वगैरे बनवू शकतो .ही भाजणी ४..५ महिने छान टिकते.

**वैशिष्ट्य:**



या एकाच भाजणी पासून वेगवेगळ्या टेस्टचे वेगवेगळे पदार्थ बनवु शकतो आणि ते पोटभरीचेही असतात. त्यामुळे दररोज वेगळे पदार्थ बनवल्याचे,खाल्ल्याचे समाधान पण मिळते. कधी उकडलेला बटाटा, तर कधी काकडी,कधी कोहाळे, लाल भोपळा वाफवून तिखट, मीठ, कोथिंबीर घालून थालीपीठे, पुऱ्या बनवू शकतो. आधी बनवून ठेवल्यामुळे आयत्यावेळी झटपट बनवू शकतो. अशा अचूक प्रमाणाने केलेली भाजणी हमखास सुरेख होतेच.

**– सौ. स्नेहा मुसरीफ,पुणे.**

# मधुमेहावर नियंत्रण ठेवण्यासाठी योगाचा प्रभावी उपयोग: ही ५ योगासने ठरतील लाभदायक


आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत चुकीच्या आहार आणि तणावमय दिनचर्येमुळे अनेक गंभीर आजारांनी डोके वर काढले आहे. त्यात मधुमेह ही एक झपाट्याने वाढणारी आणि दीर्घकालीन परिणाम करणारी आरोग्य समस्या बनली आहे. ही संख्या दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. ही समस्या पूर्णपणे बरी होणे शक्य नसले तरी, योग्य जीवनशैली आणि नियमित व्यायामाच्या सहाय्याने ती प्रभावीपणे नियंत्रणात ठेवता येऊ शकते. विशेषतः योगासने हा मधुमेह नियंत्रणात ठेवण्याचा एक नैसर्गिक आणि प्रभावी मार्ग मानला जातो.

या लेखाद्वारे आपण मधुमेह नियंत्रणासाठी फायदेशीर ठरणाऱ्या ५ प्रभावी योगासनांविषयी जाणून घेणार आहोत. ही आसने दररोज केल्यास टाइप २ मधुमेहावर चांगला परिणाम होऊ शकतो. चला तर मग जाणून घेऊया ही योगासने कोणती आहेत आणि ती कशी करावीत:

१) धनुरासन

पचनसंस्था सुधारण्यासाठी उपयुक्त आणि पचनक्रिया सुरळीत ठेवण्यास मदत करणारे हे आसन.

कसे करावे: पोटावर झोपा पाय वाकवून



घोट्यांना धरावे छाती आणि मांड्या वर उचलून शरीर धनुष्याच्या आकारात आणावे काही वेळ राहून हळूवार मूळ स्थितीत या

२) मांडूकासन

या आसनाद्वारे पोटावरील दाब वाढून अग्नि संचार सुधारतो, ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित राहते.

से करावे: वज्रासनात बसा मुठी बंद करून नाभीजवळ ठेवा श्वास सोडताना वरच्या शरीराला पुढे झुकवा ४-५ वेळा ही क्रिया करा

३) अर्धमत्स्येंद्रासन

पचन सुधारण्यासोबतच रक्तप्रवाह सुरळीत ठेवणारे आसन.

कसे करावे: पाय पुढे सरळ ठेवून बसा एक पाय वाकवून दुसऱ्या गुडघ्यावर आणा कमरेपासून शरीर वळवा आणि हाताच्या सहाय्याने पाय धरा दोन्ही बाजूंनी ४-५ वेळा करा

४) पश्चिमोत्तनासन

नाभीपासून खालील भागातील रक्तप्रवाह सुधारतो आणि पचनशक्ती वाढते.

कसे करावे: पाय सरळ ठेवून बसा श्वास सोडून पुढे वाका हातांनी पायाचे बोटे धरा आणि कपाळ गुडघ्याला लावण्याचा प्रयत्न करा १ ते २ मिनिटे राहून परत या

५) हलासन

थायरॉईड ग्रंथीच्या कार्यक्षमतेवर परिणाम करून मधुमेह नियंत्रणात ठेवणारे आसन.


कसे करावे: पाठीवर झोपा, हात शेजारी ठेवा पाय ९० अंशावर उचला नंतर पाय डोक्याच्या मागे नेऊन बोटांनी जमिनीला स्पर्श करण्याचा प्रयत्न करा ३० सेकंद थांबा आणि परत या

ही योगासने नियमितपणे केल्यास केवळ मधुमेहाच नव्हे तर संपूर्ण शरीराचं आरोग्य सुधारू शकतं. मात्र, कोणतीही नवीन व्यायाम योजना सुरू करण्यापूर्वी वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे. ही योगासने मधुमेहावर नियंत्रण मिळवण्याचा एक नैसर्गिक, सुरक्षित आणि दीर्घकालीन उपाय ठरू शकतो.

# महर्षी पराशर

डॉ. अनुराधा कुलकर्णी

ग्वेदातील ९ अग्निसूक्ते महर्षी पराशरांची आहेत. त्या सूक्तांच्या एकूण ९१ ऋचा आहेत. छोट्या ठिणगीपासून महान ज्वाळेपर्यंत बदलत जाणारे अग्निदेवांचे चैतन्यदायी रूप त्यांना दिग्विजयी सम्राटासारखे मनोरम वाटत होते. आपल्या प्राणाला जागृत ठेवणारा अग्नी जोवर शरीरात आहे, तोवरच आपण जिवंत आहोत. या शरारांतर्गत असलेल्या अग्निरूपी यज्ञात अन्नाची सतत आहुती लागते आणि तो अग्नी प्रज्ज्वलित ठेवण्यासाठी कार्यशीलतेची गरज असते. तसेच ज्ञानरूपी अग्नीची ज्योतही आपल्या हृदयात असते, ती सर्वात्मकभावाने तेवत राहते, असे अग्निविषयक वेदमंत्रांचे पराशर ऋषींना दर्शन झाले. उत्तम अपत्यासाठी अग्नी महत्त्वाचा आहे, हे महर्षी पराशरांच्या ऋचेवरून कळते. आ यत् इषे नृपतिं तेजः आनट् शुचिः रेतः निषिक्तं द्यौः अभिके । अग्निः शर्धं अनवद्य युवानं स्वाध्यं जनयत् सूदयत् च ।।ऋ.मं१सू.७१.८ अग्निदेवांचे तेज मेघांमध्ये स्थापित झाल्याने पृथ्वीवर जलवर्षाव होतो. त्यातूनच अन्ननिर्मिती होऊन ते अग्नितेजानेच शिजवले जाऊन त्यात रसपरिपोष होतो. या अन्नाचे पचनही अग्निदेवांच्या वैश्वानर रूपाने होऊन मानवांना जीवनरस मिळतो, तीच पावन ऊर्जा रेतात संयुक्त होते. अग्निदेव त्या रेताची स्थापना मानवाच्या वृषणात करतात. योग्य आहार, विहार, अष्टांग योगादी तपस्येने या वीर्याचे पोषण झाल्यास बलवान, ओजयुक्त, अव्यंग, सुडौल अशा संततीला जन्म मिळतो. अग्निदेवांनी या संतानांना श्रेष्ठ कर्मात प्रेरित करावे, असे महर्षी पराशर म्हणतात. चेदीदेशाचे राजे उपरिचर वसू व त्यांच्या महाराणी गिरिकादेवी हे उत्तम संतानासाठी व्रत करीत होते. हे व्रत



संपन्न झाले आणि आता राणीला प्राप्त होणाऱ्या ऋतुकालाचीच म्हणजे समागमासाठी असलेल्या योग्य काळाचीच प्रतीक्षा होती. त्याच समयी त्यांच्या राज्यातील वनाजवळील नगरात हिंस्र पशुंचा उपद्रव सुरू झाल्याने राजाला त्या प्राण्याच्या बंदोबस्तासाठी जावे लागले. बंदोबस्ताचे हे काम पूर्ण होत आले, त्यावेळी उपरिचरराजे अल्पकाळ एका झाडाखाली विसावा घेण्यासाठी बसले होते, त्यावेळी एका श्येन पक्ष्याद्वारे राणीचा निरोप आला की तिला ऋतुकाल प्राप्त झाला आहे, उपरिचर वसुराजाचे मन गिरिकाराणीशी पूर्ण रत झाले आणि त्यांचे वीर्यस्खलन झाले. हे वीर्य अमोघ आहे, हे राजाला ज्ञात असल्याने त्यांनी ते एका द्रोणात भरून त्यांनी श्येन पक्ष्याजवळ दिले व त्याला त्वरित राणीकडे जाण्यास सांगितले. श्येनपक्षी आपल्या चोचीत तो द्रोण घेऊन जात असता त्याला दुसऱ्या एका श्येन पक्ष्याने पाहिले. हा द्रोण म्हणजे काही खाद्यच आहे, असे समजून दुसऱ्या पक्ष्याने त्यावर झडप घातली. दोन्ही पक्ष्यांची झटापट सुरू झाली पण त्यात द्रोण कलंडून त्यातले वीर्य खाली नदीत पडले. ते नदीतल्या एका मासोळीने लगेच गिळले. एका दाशराज नावाच्या कोळ्याच्या जाळ्यात ही मासोळी सापडली. तिच्या उदरात कोळ्याला एक मुलगी मिळाली. तीच सत्यवती. सत्यवती विलक्षण सुंदर होती, तसेच कार्यतत्पर होती. कोळ्याच्या घरच्या सर्व कामात तिची मदत असल्याने तिच्या अंगाला माशांचा वास येत होता. ती यमुनानदीवर प्रवाशांना ऐलतीरावरून पैलतीरी नेण्याचेही काम करीत असे. पराशर एकदा सत्यवतीच्या नावेत बसून पैलतीरावर जात होते. सत्यवती निरपेक्ष कर्मसाधक आहे, हे त्यांच्या ध्यानी आले. त्यांना तिचा सहज कर्मयोग सुंदर वाटला. महर्षी पराशरांना आपली ज्ञानसाधना पुढे नेणारा पुत्र हवा होता. नौकानयन करणाऱ्या सत्यवतीला पाहून ही लोकोत्तर पुरुषाची माता होऊ शकेल, असा ज्योतिषशास्त्राचा गाढा अभ्यास असलेल्या पराशरांना विश्वास वाटला. महर्षी पराशरांनी सत्यवतीच्या संमतीने केवळ सत्यसंकल्पाचे बीज तिच्यात रुजविले. त्यावेळी जडत्वाचा संपर्क नसलेले धुके त्यांच्या नौकेभोवती होते. यमुनानदीतील एका द्विपावर अयोनीसंभवानेच सत्यवतीच्या पोटी व्यास जन्माला आले. या लोकविलक्षण संगाने सत्यवती माता बनूनही तिचे कौमार्य अभंग राहिले आणि ती मत्स्यगंधेची मधुरगंधा झाली. महर्षी पराशरांनी आपल्या जवळील सर्व विद्यांचे अध्ययन व्यासांकडून करवून घेतले. मुळातच दिव्य विद्यांचे तेज घेऊन आलेल्या पुत्राला त्याच्या पुढील युगप्रवर्तक कार्यासाठी सिद्ध केले. (उत्तरार्ध)

# गगनबावडा कोल्हापुरातील पर्यटकांचे आवडते ठिकाण

सरपलरूवर कोल्हापूर जिल्ह्याचा तीन टक्के भाग व्यापलेला एक तालुका म्हणजे गगनबावडा. महेश कोठारी यांच्या 'पछाडलेला' या चित्रपटाच्या शुटींगच्या निमित्ताने मी गगनबावडा येथे गेलो होतो. गगनबावडयापासून साधारण ९ किमी. अंतरावर एक भव्य ऐटबाज हवेली आहे. ही हवेली छत्रपती शाहू महाराजांच्या पंतप्रधानांनी बांधली आहे. बहुधा त्यांचे उपनाव केळकर होते असे ऐकिवात आहे.

या हवेलीमध्ये आल्यावर थंड गारवा, निलगिरीची रांगेनी उभी राहिलेली झाडे आणि नयनरम्य परिसर यांनी मन अतिशय मोहून जाते. या हवेलीमध्ये गतकाळाचे वैभव, मराठयांची शान, यांच्या निशाण्या सतत साद देत राहतात. हवेलीची भव्यता प्रथमदर्शनीच नजरेत भरते. सुरवातीला मोठे पोर्च, लांबलचक पायऱ्या आहेत. आतल्या दालनांमधील काळोख पचवण्यासाठी एक आंतरिक धीटपणा लागतो. आपणच आपल्या आत्म्याला जणू भेटायला आलो आहोत, असा भास होतो. जेंव्हा आपण अगदी एकटे असतो, फक्त आपले आपणच असतो, तेंव्हा मनाच्या गाभाऱ्यात शांतता दरवळत राहीली, तर तेच आपले खरेखुरे श्रेय. हा अनुभव इथे येत राहतो.

आतल्या भव्य मोठमोठया पण अंधाऱ्या चार खोल्या सोडल्या की वर जाणारा एक उंच पायऱ्यांचा जीना लागतो. या जिन्याने वर पोहोचल्यावर हंडया-झुंबरे असलेला उठ-बस करण्याचा खास दिवाण आहे. त्याची शान, आजूबाजूची झाडे आणि भरपूर मोकळी जागा यामुळे मनातील सर्व प्रकारची किल्मिषं दूर होतात. या जागी असणाऱ्या दोनही भव्य दिवाणखान्यांना मोठया खिडक्या जशा आहेत, तसेच मोठे व्हरांडे देखील आहेत. एक कोठीची किंवा साठवणीची खोली बाजूलाच आहे. त्या पलीकडे निजायच्या खोल्या लागतात. शिसवी पलंग, जुन्या काळातील घडवंच्या यांनी ह्या खोल्या सजल्या आहेत. या हवेलीच्या आवारात माझ्या नजरेस आलेल्या दोन विहिरी आहेत.

जिन्यावरून पुन्हा खाली आल्यावर थोडं पुढे सरल्यानंतर डावीकडे दोन खोल्या व बाथरूम आहे. तिथून मागच्या मोकळया अंगणात पाऊल पडल्यावर बऱ्याच वेळानंतर प्रकाश दिसल्याची गंमत वाटते. तिथे समोरच पाटाचं खळखळ वाहणारं पाणी येतं. मनसोक्त पाण्यात डुंबण्यासाठी या पेक्षा मस्त जागा या परिसरात दुसरी नाही. हवेलीच्या चहुबाजूला बागा आहेत. वॉकमन लावून गाणी ऐकत या झाडांच्या रांगामधून फिरण्याचा आनंद अवर्णनीय आहे. मुशाफिरी करणाऱ्या मनाला गेलेल्या काळातील गेलेले वैभव आठवून चटका मात्र सारखा लागतो.

आपला परंपरागत इतिहास, पेशव्यांचा कालखंड, मराठयांचा उदय, सरंजामशाही, शाहू राजांचा कालखंड याच्या अस्तित्वाच्या खुणा या हवेलीच्या भव्यतेमध्ये सापडतात. अनेक मराठी मालिका व चित्रपटांचे शुटिंग या हवेलीमध्ये झाले आहे. विविध प्रसंगी, विविध प्रकारे इथल्या जागेचा



उपयोग करता येतो. या हवेलीची शान, वैभव, शांत परिसर, झाडी, मागेच डोंगराळ अरण्य यामुळे निर्भरशील दिग्दर्शकांना प्रस्तुत लोकेशनचा वापर करावा असं वाटत राहीलं तर काहीच नवल नाही. गगनबावडा या शब्दामध्ये आकाश व बावडी म्हणजे विहीर हे दोन शब्द आहेत. आकाश जेंव्हा विहिरीत पडतं, त्यावेळी आपल्या मनामध्ये पसरणारी निळाई ही याच बावडयात कशी?, असं वाटत राहतं. एक असीम तन्मयता आपल्यात सामावते. या जागेची हीच तर मज्जा आहे. इथे नागर परिसरातील कोलाहल नाही. फॅशन नाही. गलबला नाही. गिचमिड नाही. म्हणूनच इथल्या 'बावडयात गगन' डोकावतं. गगनबावडयातील ही विशाल हवेली म्हणूनच माझं एक खास आवडीचं ठिकाण आहे.

**-- भरत जाधव**

## आहारातून टाळा हृदयरोग

### डॉक्टर टीप्स



मटन किंवा मांसाहारी पदार्थातील लिवर किडनी असे भाग टाळावेत. आहारात सोयाबीनचाही उपयोग करता येईल. तसेच दूध व दुधाचे पदार्थ जसे दही किंवा पनीर तयार करताना साय काढून केल्यास उत्तम.

तेल-तूप : हृदयरोग म्हटल्यावर आपल्या सर्वांना माहिती आहे की, रक्तवाहिनीत चरबी साठून रक्त प्रवाहास अडथळा निर्माण झाल्यास हार्ट अॅटॅक येऊ शकतो. हा धोका टाळण्यासाठी योग्य प्रमाणातच आहारात तेल व तुपाचा समावेश करावा. प्रमाणाव्यतिरिक्त कुठले तेल वापरतो यानेदेखील फरक पडतो. आपल्या एकूण कॅलरीजच्या गरजेपैकी साधारणत: वीस टक्के स्निग्ध पदार्थातून म्हणजे तेल व तूपातून आल्या पाहिजेत. सामान्य तापमानात फ्रीजमध्ये न ठेवता जे तेल गोठते ते हृदयासाठी चांगले नाही जसे वनस्पती तूप किंवा बटर. वेगवेगळ्या तेलबियांमधील चांगले गुण आपल्याला मिळण्यासाठी वेगवेगळ्या तेलबियांचे तेल बदलून वापरले पाहिजे. जसे करडई, शेंगदाणा, सूर्यफुल, ऑलिव्ह या व्यतिरिक्त आहारात जवस, बदाम व अक्रोड घेतल्यास यातून मिळणारे तेल हृदयासाठी खूप फायदेशीर असते.

(क्रमशः)

## विनोद




आगगाडीत तिकीट तपासणीस येतात. एक प्राध्यापक तिकीट शोधतात. खूप वेळ होतो. अखेर तपासणीस म्हणतात, 'जाऊ द्या. नका शोधू. मला खात्री आहे, तुम्ही तिकीट काढले असणार.' त्यावर प्राध्यापक म्हणतात, 'तरी मला शोधायलाच हवे, कारण उतरायचे कुठे ते कसे कळणार.'

## संदेश

Old : pehla pehla pyar hai, aayi bahar hai, aaja more sajan tera Intazar hai.

Neaw : Duja teja pyar hai, dil bekarar hai, aaja mere sajana verna Chautha taiyaar hai…!

## सुविचार



चूक ही चिवट वनस्पती आहे, ती वाटेल त्या भूमीत फोफावते.

- मार्टिन रूपर


**संस्कृत सुभाषित**

मित्रं वा बन्धुं वा वैवातिप्रणयपीडितं कुर्यात्।

स्वम वत्समतिपिबन्तं विषाण कोट्याक्षिपति धेनु:।।

अर्थ : मित्राच्या किंवा आप्ताच्या प्रेमाचा फार फायदा घेऊ नये. स्वत:चे वासरू जर जास्त दूध पिऊन त्रास देत असेल तर गाय स्वत: त्यालाही शिंगानी ढोसून दूर करते.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. डोंगरराजीतील साहसी पर्यटन
४. गुणज्ञ
८. वक्र
११. पानाचे दुकान
१२. अफूचे बी
१४. महिना
१५. पहारेकरी
१८. विपुलता
२०. हस्तेपरहस्ते
२२. जिवलग मैत्रिण
२३. निकट
२५. रडगाणे, रडकथा
२६. अरण्य
२८. वृक्ष
३०. होडी चालवणारा
३२. किल्ली
३४. घनिष्ठ संबंध
३६. समुद्राच्या लाटांचा आवाज
३८. दर पंधरा दिवसांनी प्रसिद्ध होणारे नियतकालिक
३९. '-- जनाब ने पुकारा नहीं, क्या मेरा साथ भी गंवारा नहीं'
४०. मीठ
४१. थोडेसे
४२. जन्मदाता
४३. हेतू, कारण, स्वार्थ
४५. रेती
४६. विष्णुपत्नीचे एक नाव
४८. वर्ष, साल
४९. लिंबूसाखरेचे थंड पेय
५२. अंगावर येणारा काटा
५४. पादत्राण
५५. गहन
५६. स्वर्गाचे दोन पहारेकरी
५८. तापापूर्वीचे अंग मोडून येणे
६०. घास पण गवत नव्हे
६१. एक चतुर्थांश
६२. व्रत, नेम
६४. उदर
६५. जयघोष
६७. अनुमती
६९. सुंभाबरोबर न जळणारा
७१. मोठा जाड अंगरखा
७२. तांब्या-पितळेची भांडी तयार करणारा
७४. '-- ---- म्हणतील हाय, हाय! मी जाता राहील कार्य काय?' (भा.रा.तांबे)
७७. गवंडी
७८. अचेतन शरीर
७९. पार्वतीचे उग्र रूप
८०. वशिला
८१. सोशिकपणा

## उभे शब्द

१. आस्था, फिकीर
२. तारणारा
३. आयुध
४. मद्य तयार करणारा-विकणारा
५. रुक्ष
६. सेवक
७. लचकत-मुरडत अशी चाल अथवा चालणारी
९. जास्तीतजास्त
१०. मच्छर
११. जपून ठेवलेली गोष्ट
१३. अखंड
१६. मोठे भांडण
१७. राममंदिरातील मारुतीचे रूप
१९. जीव, प्राण, चैतन्य
२०. चलनवलन
२१. अति खाण्यामुळे पोटाला बसणारी ओढ
२४. उगीच
२७. आवर घालणारी वादी
२९. शंभर पैशाचे नाणे
३१. प्रवाशांना घेऊन अधांतरी उडणारे
३३. डोंगरातील लांब गुहावजा जागा
३५. खुमारी
३७. उष्णतेमुळे पायाला भेगा पडण्याचा रोग
४१. आकाश
४२. पाण्याचा साठा असलेली जागा
४३. अंत:करण
४४. हावरटपणा
४७. इंद्रिय
४८. हुक्की, लहर
५०. मजबूत, भक्कम
५१. चरण
५३. राजसुख
५५. डोक्याला झालेली खोल जखम
५६. मनातली आग
५७. स्थानापन्न (होणे)
५९. उत्सवाचे दिवस
६१. चबुतरा
६३. भेग, चीर
६६. अंजन
६८. रविंद्रनाथ टागोरांचा काव्यसंग्रह
७०. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या आपण सगळेच
७१. नाजूक
७३. पत्र
७४. एक गळित धान्य
७५. वारा
७६. यज्ञ
७७. पौर्णिमा

## आडवे उत्तरे

१.पर्वतारोहन ४.कदरदान ८.वाकडा ११.ठेला १२.खसखस १४.मास १५.रखवालदार १८.रेलचेल २०.हातोहात २२.सखी २३.लगत २५.रड २६.जंगल २८.तरू ३०.नाविक ३२.चावी ३४.सलगी ३६.गाज ३८.पाक्षिक ३९.माना ४०.लवण ४१.अंमळ ४२.जनक ४३.मतलब ४५.वाळू ४६.कमला ४८.सन ४९.सरबत ५२.शहारा ५४.वहाण ५५.खोल ५६.जयविजय ५८.कसकस ६०.कवळ ६१.पाव ६२.वसा ६४.पोट ६५.जयजयकार ६७.परवानगी ६९.पीळ ७१.कोट ७२.तांबट ७४.जन पळभार ७७.राज ७८.शव ७९.महाकाली ८०.लग्गा ८१.सहनशीलता

## उभे उत्तरे

१.पर्वा २.तारणहार ३.हत्यार ४.कलाल ५.रखरखीत ६.दास ७.नखरेल ९.कमाल १०.डास ११.ठेवा १३.सलग १६.खडाजंगी १७.दास १९.चेतना २०.हालचाल २१.तडस २४.हकनाक २७.लगाम २९.रुपाया ३१.विमान ३३.विवर ३५.लज्जत ३७.जळवात ४१.अंबर ४२.जलाशय ४३.मन ४४.लसलस ४७.अवयव ४८.सणक ५०.बळकट ५१.पाय ५३.राणीव ५५.खोक ५६.जळजळ ५७.विराजमान ५९.सणवार ६१.पार ६३.सापट ६६.काजळ ६८.गीतांजली ७०.करदाता ७१.कोमल ७३.टपाल ७४.जवस ७५.पवन ७६.होम ७७.राका



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### 'माझी अवस्था रोहित शर्मासारखी झालीय...' टॉसवेळी सूर्यकुमार यादवला

मुंबई-आशिया कप २०२५ चा शेवटचा ग्रुप स्टेज सामना आज भारत आणि ओमान यांच्यात अबू धाबी येथील शेख झायेद क्रिकेट स्टेडियमवर खेळला जात आहे. टीम इंडियाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पण, सूर्यकुमार यादवने ओमानविरुद्धच्या सामन्यात असे काही केले की सर्वांना हसायला भाग पाडले. नाणेफेक जिंकल्यानंतर संघाबद्दल विचारले असता तो एका खेळाडूचे नाव विसरला. त्याने खेळाडू म्हणून हर्षित राणाचा उल्लेख केला, पण दुसऱ्या खेळाडूचं नाव त्याला आठवले नाही. मग तो म्हणाला की, ''मी रोहित शर्मासारखा झालो आहे का?'' रोहित शर्मा देखील अनेक गोष्टी विसरतो आणि त्याचे नाव घेऊन सूर्यकुमार यादवने सोशल मीडियावर व्हायरल कंटेंट दिला आहे. भारताने नाणेफेक जिंकून घेतला फलंदाजीचा निर्णय....

भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादवने ओमानविरुद्धच्या सामन्यासाठी अंतिम इलेव्हनमध्ये दोन बदल केल्याची घोषणा केली. वरुण चक्रवर्तीच्या जागी हर्षित राणा आणि जसप्रीत बुमराहच्या जागी अर्शदीप सिंगचा समावेश करण्यात आला आहे. या सामन्यासाठी भारताने दोन स्पेशालिस्ट स्पिनर्स आणि दोन स्पेशालिस्ट गोलंदाजांना मैदानात उतरवले आहे. ओमाननेही दोन बदल केले आहेत.

नाणेफेक जिंकल्यानंतर सूर्यकुमार यादव काय म्हणाला?

सूर्यकुमार यादवने नाणेफेक जिंकल्यानंतर सांगितले की, त्याने या स्पर्धेत दोन सामन्यांमध्ये प्रथम गोलंदाजी केली होती.

***

### १४ चौकार, १ षटकार अन् १५० धावा! ऑस्ट्रेलियाविरुद्ध देवदत्त पडिक्कलची मॅरेथॉन इनिंग

दिल्ली-सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ सध्या आशिया कप २०२५ मध्ये खेळत आहे. त्यानंतर, टीम इंडिया घरच्या मैदानावर वेस्ट इंडिजविरुद्ध कसोटी मालिका खेळणार आहे. या मालिकेसाठी भारतीय संघाची संघ अद्याप जाहीर झालेला नाही, परंतु कसोटी संघाबाहेर असलेला डावखुरा फलंदाज देवदत्त पडिक्कलने ऑस्ट्रेलिया अ विरुद्धच्या पहिल्या अनधिकृत कसोटी सामन्यात शानदार शतक झळकावून पुनरागमनाचा जोरदार दावा केला आहे. ज्यामुळे बीसीसीआयची डोकेदुखी वाढणार आहे. ऑस्ट्रेलिया अ सध्या भारताच्या दौऱ्यावर आहे, लखनौच्या एकाना क्रिकेट स्टेडियमवर दोन सामन्यांच्या अनधिकृत कसोटी मालिकेतील पहिला सामना खेळत आहे. प्रथम फलंदाजी करताना, कांगारूंनी त्यांचा पहिला डाव ५३२ धावांवर घोषित केला. त्यानंतर, भारतीय अ संघाने देवदत्त पडिक्कल आणि ध्रुव जुरेल यांचे उत्कृष्ट शतक साकारले. पडिक्कलने २८१ चेंडूत १४ चौकार आणि एक षटकार मारत १५० धावा केल्या. पडिक्कलने आता वेस्ट इंडिजविरुद्धच्या आगामी दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी टीम इंडियाच्या संघात पुनरागमनाचा दावा बळकट केला आहे. पडिक्कलने आतापर्यंत फक्त दोन कसोटी सामने खेळले आहेत, तीन डावांमध्ये ३० च्या सरासरीने ९० धावा केल्या आहेत.ऑस्ट्रेलिया अ विरुद्धच्या सामन्यात, भारतीय अ संघाला देवदत्त पडिक्कलसह यष्टीरक्षक-फलंदाज ध्रुव जुरेलने १३५ धावांची शानदार खेळी देखील पाहायला मिळाली. ऋषभ पंत पूर्णपणे बरा होऊ शकला नाही तर, वेस्ट इंडिजविरुद्धच्या आगामी कसोटी मालिकेसाठी जुरेलचा अंतिम संघात समावेश निश्चित मानला जात आहे. इंग्लंड दौऱ्यासाठी जुरेलचा दुसरा यष्टीरक्षक म्हणून संघात समावेश करण्यात आला होता.

***

### जहीर खानने सोडली लखनऊ सुपरजायंट्सची साथ; फक्त एका सीझननंतर घेतला निर्णय,

मुंबई -आयपीएल २०२५ च्या हंगामानंतर मोठी बातमी समोर आली आहे. टीम मेंटर म्हणून लखनऊ सुपरजायंट्सशी जोडलेले माजी भारतीय वेगवान गोलंदाज जहीर खान यांनी फक्त एका सीझननंतरच फ्रँचायझीला रामराम ठोकला आहे. जहीरने ऑगस्ट २०२४ मध्ये दोन वर्षांच्या करारासह एलएसजीमध्ये प्रवेश केला होता, पण अपेक्षेपेक्षा लवकर त्यांनी संघाचा निरोप घेतला.

गंभीरनंतर घेतली जबाबदारी

गौतम गंभीरने २०२३ च्या हंगामानंतर लखनऊचा निरोप घेत कोलकाता नाईट रायडर्सशी पुन्हा हातमिळवणी केली होती. त्यानंतर जहीर खानला संघाच्या मार्गदर्शनाची जबाबदारी देण्यात आली. मुंबई इंडियन्ससोबत २०१८ ते २०२२ या काळात काम केलेल्या जहीरकडून मोठ्या अपेक्षा होत्या.

मतभेद ठरले निर्णायक-एड्झछ्लीळलळपषे च्या वृत्तानुसार, जहीर खानच्या जाण्याचं मुख्य कारण म्हणजे हेड कोच जस्टिन लँगर आणि मालक संजिव गोयनका यांच्यातील बॉण्डिंग. रणनीतीबाबत जहीरचा दृष्टिकोन वेगळा होता आणि त्यामुळे फ्रँचायझीतील वातावरणावर परिणाम झाला. जरी त्याचे कर्णधार ऋषभ पंत सोबत चांगले संबंध होते, तरी वेगवेगळ्या विचारांमुळे त्यांचे समीकरण टिकू शकले नाही.

लखनऊचा कामगिरीचा आलेख

लखनऊ सुपरजायंट्सने मागील दोन हंगामात नॉकआउटमध्ये प्रवेश मिळवला नव्हता. २०२५ मध्ये तर संघाला सातव्या स्थानी समाधान मानावं लागलं. १४ पैकी ६ सामने जिंकून संघाचं प्रदर्शन अस्थिर राहिलं.

# भारताने सामना जिंकला, पण २० नंबरचा संघ टीम इंडियावर भारी पडला

नवी दिल्ली: भारत आणि ओमान यांच्यात झालेल्या सामन्यात भारतीय संघाने दमदार कामगिरी करत विजय मिळवला आहे. : आशिया चषकातील भारतीय संघाचा साखळी फेरीतील शेवटचा सामना ओमानविरूद्ध पार पडला. या सामन्यात नवख्या ओमानने भारतीय संघाला कडवी झुंज दिली. भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आणि प्रथम फलंदाजी करताना १८८ धावा केल्या. १८९ धावांचा पाठलाग करताना ओमानकडून २ फलंदाजांनी दमदार अर्धशतकी झळकावली. पण शेवटी भारतीय संघाने हा सामना २१ धावांनी जिंकला. या सामन्यात भारतीय



गोलंदाजांकडून हवी तशी कामगिरी पाहायला मिळाली नाही. भारतीय संघ टी-२० वर्ल्ड चॅम्पियन संघ आहे. पण ओमानच्या फलंदाजांनी भारतीय गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. ओमानकडून २ फलंदाजांनी दमदार अर्धशतकं झळकावली. धावांचा पाठलाग करताना ओमानकडून आमिर कलीम आणि हमद मिर्झाने अर्धशतकी खेळी केली. या दोघांनी मिळून ९० पेक्षा अधिक धावांची भागीदारी केली. या सामन्यात ओमानचा संघ विजयाच्या जवळ पोहोचला होता. पण शेवटी भारतीय गोलंदाजांनी आपल्या अनुभवाचा पुरेपुर फायदा घेत हा सामना आपल्या नावावर केला.ओमानला हा सामना जिंकण्यासाठी १८९ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना ओमानकडून कर्णधार जतिंदर सिंगने दमदार सुरूवात श्रकरून दिली. त्याने ३३ चेंडूत ३२ धावांची खेळी केली. तर आमिर कलीम जोपर्यंक उभा होता, तोपर्यंत असं वाटत होतं की ओमानचा संघ हा सामना जिंकू शकतो. आमिरने ४६ चेंडूंचा सामना करत ६४ धावांची दमदार खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने ७ चौकार आणि २ षटकार मारले. त्याला साथ देत हमद मिर्झाने ३३ चेंडूत ५१ धावांची खेळी केली.

या खेळीदरम्यान त्याने ५ चौकार आणि २ षटकार मारले. शेवटी जितेनकुमार रामानंदीने नाबाद १२ धावांची खेळी केली. ओमानला २० षटकांअखेर १६७ धावा करता आल्या. ज्यावेळी आमिर कलीम आणि हमद मिर्झा फलंदाजी करत होते, त्यावेळी धावांची गती वाढली होती. ओमानचा संघ विजयाच्या दिशेने आगेकूच करत होता. पण नेमकं त्याचवेळी हर्षित राणाच्या गोलंदाजीवर हार्दिक पंड्याने सीमारेषेवर अविश्वसनिय झेल घेतला. हा या सामन्यातील टर्निंग पाँईट ठरला.

## ज्याच्या गोलंदाजीवर सलग ५ षटकार ठोकले त्याच्याच वडिलांच्या निधनाची बातमी ऐकून नबी स्तब्ध

दिल्ली-आशिया कप २०२५ दरम्यान गुरुवारी एक अतिशय दु:खद बातमी समोर आली. श्रीलंकेचा युवा गोलंदाज दुनिथ वेल्लालागे सामन्यात खेळत असतानाच त्याच्या वडिलांचे निधन झाले. ही माहिती त्याला सामन्यानंतर देण्यात आली. मैदानाबाहेर असलेल्या पत्रकारांनी जेव्हा ही गोष्ट मोहम्मद नबीला सांगितली, तेव्हा तो क्षणभर थक्क झाला. कारण, याच सामन्यात नबीने वेल्लालागेच्या एका षटकात सलग ५ षटकार ठोकले होते.

नबीची तुफानी खेळी

अफगाणिस्तानने प्रथम फलंदाजी करताना १६९ धावांचा डोंगर उभारला होता. त्यात नबीने महत्त्वाची भूमिका बजावली. त्याने फक्त २२ चेंडूत ६ षटकार आणि ३ चौकारांच्या मदतीने ६० धावा फटकावल्या. विशेष म्हणजे, वेल्लालागेच्या टाकलेल्या शेवटच्या षटकात नबीने एकट्याने ५ षटकार ठोकले. या षटकात तब्बल ३२ धावा निघाल्या आणि वेल्लालागेच्या चेहऱ्यावर निराशा स्पष्ट दिसत होती.

सामना संपल्यानंतर नबी जेव्हा संघासोबत हॉटेलकडे जात होता, तेव्हा पत्रकारांनी त्याला वेल्लालागेच्या वडिलांच्या निधनाबाबत माहिती दिली. ही बातमी ऐकून नबी क्षणभर गप्पच बसला. ''कधी?'' असा त्याने थोड्याशा अविश्वासाने प्रश्न विचारला. त्यावर पत्रकारांनी सांगितले की, पहिली डाव संपल्यानंतर ही बातमी आली होती. दरम्यान, वडिलांच्या निधनाची बातमी समजताच वेल्लालागे तातडीने यूएईहून श्रीलंकेसाठी रवाना झाला. विशेष म्हणजे, हा सामना वेल्लालागेचा आशिया कप २०२५ मधील पहिलाच सामना होता. यापूर्वी तो बांगलादेश आणि हाँगकाँगविरुद्ध खेळला नव्हता. श्रीलंकेच्या विजयातून बांगलादेशलाही फायदा

अफगाणिस्तानच्या १६९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेने १९व्या षटकात विजय मिळवला.


## हार्दिक पंड्याने सीमारेषेजवळ टिपला चकित करणारा कॅच

**नवी दिल्ली:**हार्दिक पंड्याने ओमानविरूद्ध सामन्यात कमालीचा झेल टिपल सामन्याचा रोख बदलला आणि भारताने सामना जिंकला. त्याच्या झेलचा व्हीडिओ सध्या व्हायरल होत आहे.

आशिया चषक स्पर्धेत भारतीय संघाने ओमानविरूद्ध विजय मिळवत विजयाची हॅटट्रिक लगावली. पण नवख्या ओमानने मात्र भारताविरूद्ध उत्कृष्ट कामगिरी करत त्यांना सहज विजय मिळवू दिला नाही. पण भारतीय संघाने सामन्यात पुनरागमन करत विजय मिळवला. पण या सामन्यात हार्दिक पंड्याने सीमारेषेजवळ टिपलेला झेल सामन्याचा टर्निंग पॉईंट ठरला.

भारताने प्रथम फलंदाजी करताना १८८ धावा केल्या, पण प्रत्युत्तरात ओमानच्या फलंदाजांनी दमदार कामगिरी करत सर्वांची मनं जिंकली. ओमानने २० षटकांत ४ गडी गमावून १६७ धावा केल्या. ओमानकडून ४३ वर्षीय अमीर कलीमने सर्वाधिक ६४ धावा केल्या. हमाद मिर्झानेही ३३ चेंडूत ५१ धावा केल्या. जतिंदर सिंगने ३३ चेंडूत ३२ धावांची खेळी केली. भारताची गोलंदाजी फारशी चांगली झाली नाही. हार्दिक पंड्या, अर्शदीप सिंग, हर्षित राणा आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी एक विकेट घेता आली.

या सामन्यात ओमानचे फलंदाज भारताच्या गोलंदाजांची शाळा घेत असतानाच आता सामना भारताच्या निसटतो की काय अक्षरश: अशी स्थिती निर्माण झाली होती. इतक्यात हर्षित राणाच्या १८व्या षटकात हार्दिक पंड्याने एक उत्कृष्ट झेल टिपत संघाला मोठी विकेट मिळवून दिली. हार्दिक पंड्याचा झेल पाहून सगळेच झाले अवाकब, वरूण चक्रवर्तीने तोंडावर ठेवला हात ओमानचा फलंदाज आमीर कलीम मैदानात मोठमोठे फटके खेळत होता. हर्षितच्या १८व्या षटकात त्याने पहिल्या दोन चेंडूवर दोन चौकार लगावले होते आणि नंतर चौथ्या चेंडूवर मोठा फटका खेळण्यासाठी त्याने उजव्या बाजूला फ्लिक केला. तिथे फाईन लेगवर पंड्या तैनात होता. त्याने क्षणात उजव्या बाजूला हात आणि शरीराचा तोल टाकत एक कमालीचा झेल टिपला. फक्त झेलच नाही टिपला तर त्याने स्वत:चं शरीर सावरत सीमारेषेला पाय लागणार नाही याची पूर्णपणे काळजी घेतली. भारतीय संघ व्यवस्थापनाचा ओमानविरूद्ध सामन्यात चकित करणारा निर्णय, कर्णधारालाचः; मीम्सचा आला पूर हार्दिक पंड्याचा हा झेल पाहून वरूण चक्रवर्तीने तर तोंडावर हात ठेवत आश्चर्य व्यक्त केलं. तर बुमराहने देखील चकित



होत त्याच्या झेलचं कौतुक केलं. हार्दिकचा हा झेल सामन्याचा टर्निंग पॉईंट ठरला. अमीर कलीम मैदानावर चांगलाच सेट झाला होता. त्याने ४६ चेंडूत ७ चौकार आणि २ षटकारांसह ६४ धावांची वादळी खेळी केली होती. ज्याचा टीम इंडियाला चांगलाच फटका बसत होता. पण हार्दिकचा हा टर्निंग पॉईंट असलेला झेल भारताच्या पथ्यावर पडला.

## संडे डबल धमाका! दुबईत इंडिया-पाक सामना रंगणार, वैभव सूर्यवंशीही उतरणार मैदानात

दिल्ली-भारतीय संघाने आशिया चषक २०२५ स्पर्धेतील सुपर ४ मध्ये प्रवेश केला आहे. भारतीय संघाचा सुपर ४ फेरीतील पहिला सामना येत्या रविवारी (२१ सप्टेंबर) पाकिस्तानबरोबर रंगणार आहे. याआधी १४ सप्टेंबरला झालेल्या भारत- पाकिस्तान सामन्यात भारतीय संघाने एकतर्फी विजयाची नोंद केली होती. रविवारी क्रिकेट चाहत्यांना क्रिकेटचा डबल धमाका पाहायला मिळणार आहे. एकीकडे सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली खेळणारा भारतीय संघ पाकिस्तानचा सामना करणार आहे. तर दुसरीकडे १९ वर्षाखालील संघ ऑस्ट्रेलियाविरूद्ध खेळणार आहे.

आयुष म्हात्रेच्या नेतृत्वाखाली खेळणारा भारतीय १९ वर्षाखालील संघ सध्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये ३ युथ वनडे सामन्यांची मालिका रंगणार आहे. त्यामुळे रविवारी आयुष म्हात्रे देखील ॲक्शनमध्ये दिसणार आहे. याआधी इंग्लंड दौऱ्यावर फलंदाजी करताना त्याने धावांचा पाऊस पाडला होता. आता ऑस्ट्रेलियाविरूद्ध देखील त्याच्याकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा असणार आहे. या दौऱ्यावर भारतीय संघ ३ युथ वनडे सामन्यांची मालिका खेळणार आहे. तर २ युथ कसोटी सामन्यांची मालिका देखील खेळणार आहे.दोन्ही सामने किती वाजता सुरू होणार?भारत आणि पाकिस्तान यांच्यात होणारा आशिया चषकातील सामना भारतीय वेळेनुसार हा सामना रात्री ८ वाजता सुरू होणार आहे. नाणेफेक ७:३० वाजता होईल. तर भारतीय १९ वर्षाखालील विरूद्ध ऑस्ट्रेलिया १९ वर्षाखालील यांच्यात होणारा सामना हा भारतीय वेळेनुसार सकाळी १० वाजता सुरू होणार आहे. तर नाणेफेक सकाळी ९:३० वाजता होईल. या सामन्यात कर्णधार आयुष म्हात्रे आणि स्फोटक फलंदाज वैभव सूर्यवंशीच्या कामगिरीकडे सर्वांचं लक्ष लागून असणार आहे.भारत- ऑस्ट्रेलिया युथ मालिकेचं संपूर्ण वेळापत्रक

पहिला वनडे सामना- २१ सप्टेंबर (नॉर्थ्स)दुसरा वनसे सामना- २४ सप्टेंबर (नॉर्थ्स)

तिसरा वनडे सामना- २६ सप्टेंबर (नॉर्थ्स)

बहुदिवसीय कसोटी सामना

पहिला युथ कसोटी सामना- ३० सप्टेंबरपासून (नॉर्थ्स)दुसरा युथ कसोटी सामना – ७ ऑक्टोबरपासून ( नॉर्थ्स)

ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी असा आहे भारतीय १९ वर्षाखालील संघ:

वैभव सूर्यवंशी, आयुष म्हात्रे (कर्णधार), विहान मल्होत्रा (उपकर्णधार),वेदांत त्रिवेदी, राहुल कुमार, अभिज्ञान कुंडू (यष्टीरक्षक), हरवंश सिंग (यष्टीरक्षक), आरएस अंबरीश, कनिष्क चौहान, नमन पुष्पक, हेनिल पटेल, डी. दिपेश, किशन कुमार, अनमोलजीत सिंग, खिलान पटेल, उधव मोहन, अमन चौहान.

## ओमानविरुद्ध भारत पहिल्यांदा करणार फलंदाजी

अबुधाबी-आशिया कप २०२५चा ग्रुप स्टेजमध्ये शेवटचा सामना आज भारत आणि ओमान यांच्यात खेळवला जात आहे. हा सामना अबुधाबीमध्ये रंगतोय.या सामन्यात भारतीय संघाने नाणेफेक जिंकत पहिल्यांदा फलंदाजीचा निर्णय घेतला आहे.

टीम इंडियाने आधीच सुपर ४मध्ये स्थान बनवले आहे आणि पाकिस्तानविरुद्ध २१ सप्टेंबरला होणाऱ्या महत्त्वाच्या सामन्याआधी हा सामना टीम मॅनेजमेंटसाठी योग्य ठरू शकतो. तर ओमानचा संघ आधीच बाहेर झाला आहे आणि या स्पर्धेतील त्यांचा शेवटचा सामना आहे.ओमानचा संघ या स्पर्धेत अजूनही आपल्या पहिल्या विजयाच्या शोधात आहे. त्यांनी मागील सामन्यांमध्ये चांगला संघर्ष दाखवला आहे, परंतु त्यांना अनुभवी संघांपुढे मोठी धावसंख्या उभारण्यात किंवा कमी धावसंख्येवर प्रतिस्पर्धकांना रोखण्यात अपयश आले आहे.

भारतासारख्या बलाढ्य संघाविरुद्ध विजय मिळवण्यासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट कामगिरी करावी लागेल. आजचा हा सामना भारतीय क्रिकेट चाहत्यांसाठी खास असणार आहे. भारत आपली विजयी मालिका कायम ठेवणार की, ओमान काहीतरी चमत्कार करणार, हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल.

## टीम इंडियाची विक्रमी कामगिरी! असा पराक्रम करणारा ठरला जगातील दुसराच संघ

**नवी दिल्ली:** आशिया चषकात शुक्रवारी (१९ सप्टेंबर) झालेल्या सामन्यात भारतीय संघ भारत आणि ओमान हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. हा सामना भारतीय संघासाठी ऐतिहासिक ठरला आहे. हा भारतीय संघाचा टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील २५० वा सामना ठरला. यासह भारतीय संघ टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २५० सामने खेळणारा दुसरा संघ ठरला आहे. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २७५ सामने खेळणारा पाकिस्तानचा संघ या यादीत अव्वल स्थानी आहे.

टी-२० आंतराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २५० सामने खेळण्याचा विक्रम हा आधी पाकिस्तानच्या नावावर होता. या क्लबमध्ये आता भारतीय संघाने एन्ट्री केली आहे. २३५ सामन्यांसह न्यूझीलंडचा संघ या यादीत तिसऱ्या स्थानी आहे. २२८ टी-२० आंतरराष्ट्रीय खेळणारा वेस्टइंडिजचा संघ या यादीत चौथ्या स्थानी आहे. तर २१२ सामने खेळणारा श्रीलंकेचा संघ या यादीत पाचव्या स्थानी आहे.भारतीय संघाने उभारला १८८ धावांचा डोंगर

या सामन्यात भारतीय संघाचा कर्णधार सूर्यकमार यादवने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतेला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाने २० षटकांअखेर ८ गडी बाद १८८ धावांचा डोंगर उभारला. भारतीय संघाकडून डावाची सुरूवात करण्यासाठी आलेल्या अभिषेक शर्माने ३८ धावांची खेळी केली. तर शुबमन गिल अवघ्या ५ धावा करून माघारी परतला. संजू सॅमसनने मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन ५६ धावांची खेळी केली. तर हार्दिक पंड्या १ धाव करून माघारी परतला. अक्षर पटेलने २६ धावा केल्या.

ओमानच्या गोलंदाजाचा 'ड्रिम बॉल' अनब गिल क्लीन बोल्ड, शुबमन मागे न पाहताच गेला मैदानाबाहेर; पाहा काय घडलं? तखऊएज

तर तिलक वर्माने २९ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर भारतीय संघाने २० षटकांअखेर ८ गडी बाद १८८ धावा केल्या. गेल्या दोन्ही सामन्यांमध्ये ज्या फलंदाजांना फलंदाजीची संधी मिळाली नव्हती. त्या फलंदाजांना या सामन्यात फलंदाजीची संधी मिळाली. मुख्य बाब म्हणजे कर्णधार सूर्यकुमार यादव या सामन्यात फलंदाजीला आलाच नाही. त्याने सर्वांना फलंदाजीची संधी दिली.



पाकिस्तान अव्वल स्थानी

# रेणापूर येथे नमो उद्यान विकसित करण्यासाठी आ. कराड यांच्या प्रयत्नातून एक कोटीचा निधी

**लातूर/प्रतिनिधी :** रेणापूर येथे नमो उद्यान विकसित करण्यासाठी राज्यातील महायुती शासनाच्या नगर विकास विभागामार्फत लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून तब्बल एक कोटी रुपयाचा निधी मंजूर झाला असून सदरील निधी मंजूर करून दिल्याबद्दल आ. कराड यांचे रेणापूर येथील भाजपा कार्यकर्त्यांसह नागरिकांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले आहे.

उत्कृष्ट उद्यान विकसित करून रेणापूर शहरातील नागरिकांना चांगल्या दर्जाचे उद्यान उपलब्ध व्हावे या उद्देशाने उद्यानास मंजुरी मिळावी त्यास निधी उपलब्ध व्हावा यासाठी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब आणि नगर विकास विभागाचे मंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला होता.

आ. रमेशआप्पा कराड यांनी केलेल्या पाठपुरावाला यश आले असून राज्य शासनाच्या नगर विकास विभागामार्फत १७ सप्टेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत रेणापूर येथील उद्यानासाठी तब्बल एक कोटी रुपयाचा निधी मंजूर केला आहे.

गेल्या काही दिवसात राज्यातील महायुती शासनाच्या माध्यमातून रेणापूर येथील विविध विकास कामासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी आ. रमेशआप्पा कराड यांनी उपलब्ध करून दिला त्यातून रेणापूरच्या सर्वांगीण विकासाला गती मिळाली असून नमो उद्यान विकसित करण्यासाठी मंजूर एक कोटी रुपयांच्या निधीतून अत्यंत चांगल्या दर्जाचे उद्यान विकसित केले जाणार आहे या उद्यानामुळे रेणापूरच्या विकासात निश्चितपणे भर पडणार आहे शिवाय सर्व स्तरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

उद्यान विकासासाठी एक कोटी रुपयाचा निधी रेणापूर नगरपंचायतीला मिळवून दिल्याबद्दल लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, भाजपाचे चंद्रकांत कातळे, दिलीप



आकनगिरे, विजय चव्हाण, दत्ता सरवदे, सुधीर तोडकरी, भाजपा शहराध्यक्ष अच्युत कातळे, भाजयुमो शहराध्यक्ष गणेश चव्हाण, संजय विरूळे, उज्वल कांबळे, राजकुमार आलापुरे, मनिषा मुंडे, दिनकर राठोड, उत्तम चव्हाण, महेश गाडे, संतोष राठोड, मारुफ आत्तार, उत्तम घोडके, लखन आवळे, दिलीप चव्हाण, शेख अजीम, अंतराम चव्हाण, शिवाजी भावे, हनुमंत भालेराव, गणेश माळेगावकर, रमा चव्हाण, अजय मारलापल्ले, रफिक शिकलकर, नंदकुमार बंडे, सचिन शिरसकर, विश्वनाथ उरगुंडे, जगन्नाथ कातळे, शरद चक्रे, सोपान सातपुते, निलेश उरगुंडे, सुरज फुलारी, अंकुश मोटेगावकर, मनोज चक्रे यांच्यासह भाजपा कार्यकर्त्यांनी व नागरिकांनी आभार व्यक्त केले आहे.

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबईच्या अर्धापूर तालुका अध्यक्षपदी जेष्ठ पत्रकार उद्धवराव सरोदे यांची नियुक्ती



**नांदेड/प्रतिनिधी :**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबईच्या अर्धापूर तालुकाध्यक्षपदी उध्दव बळीराम सरोदे यांची जल्लोषात निवड महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई प्रदेश निवड समीती अध्यक्ष तथा दैनिक समीक्षाचे संपादक रूपेशजी पाडमुख व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ नांदेड जिल्हाध्यक्ष संग्राम मोरे यांच्या हस्ते निवडीचे नियुक्तीपत्र देण्यात आले.महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ अर्धापूर तालुक्याचे उर्वरित कार्यकारिणी ज्येष्ठ पत्रकार वली मोहम्मद खतीब,गंगाधर सुर्यवंशी, पत्रकार शेख शकील,पत्रकार बिबिशन कांबळे,प्रभाकर वाघमारे, पत्रकार शेख बशीर,शेख मौला, पत्रकार वैभव माटे,पत्रकार अँड. गौरव सरोदे,पत्रकार व्यंकटी गोरे, पत्रकार आनंद मोरे,पत्रकार राजेश पंडित,पत्रकार राजकिरण गव्हाणे, छायाचित्रकार राजेश पळसकर, राजेश चौधरी,अमोल सरोदे,शुभम सरोदे,प्रशांत ऐंगडे,वैशाली ऐंगडे यांच्या सह आदि उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ तालुका अर्धापूर यांच्या निवडीचे अर्धापूर शहर,तालुका व नांदेड जिल्ह्यात ठिकठिकाणी जल्लोषात स्वागत व सत्कार करुन पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात येत आहेत.

**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश निवड समिती अध्यक्ष तथा दैनिक समीक्षाचे संपादक रूपेशजी पाडमुख व जिल्हाध्यक्ष संग्राम मोरे यांच्या पुढाकारातून नियुक्तीपत्र प्रदान**

## सामाजिक शास्त्र अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदी कृष्णा धामणगावे तर सचिवपदी यश कांबळे यांची निवड

**बाभळगाव :** दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा यासाठी महाविद्यालयात



२३ विविध मंडळ आणि समित्या यांची स्थापना प्रत्येक शैक्षणिक वर्षात केली जाते. त्यामध्ये सर्व सामाजिक शास्त्र एकत्र अशा सामाजिक शास्त्र मंडळाच्या अध्यक्षपदी कृष्णा गोविंद धामणगावे तर सचिवपदी यश गोविंद कांबळे यांची गुणाानुक्रमे बिनविरोध निवड करण्यात आली.

इतिहास विभाग प्रमुख डॉ. नरेंद्र देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या एका बैठकीमध्ये अध्यक्ष, सचिव आणि इतर पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. त्यामध्ये उपाध्यक्ष प्रांजली संतोष शिंदे, सहसचिव रूपाली दत्ता मस्के, प्रसिद्धी प्रमुख आदित्य रमेश पणबोणे तर सदस्य म्हणून ऋषिकेश गोविंद रेणके, नेहा सुरेश जवादे, आदित्य विलास कांबळे, आदित्य रमेश बनवणे, कविता कांबळे, मंगेश वाल्मीक लहाने यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, सामाजिक शास्त्र अभ्यास मंडळ प्रमुख प्रा. चंद्रकांत मोरे, डॉ.नाना जाधव, डॉ. इंद्रजीत शिंदे, डॉ. मीनाक्षी कोंगे यांनी अभिनंदन केली आहे.

## मुंबई– नांदेड दरम्यान रेल्वे ४ विशेष गाड्या चालवणार



**मुंबई/प्रतिनिधी :** सणासुदीच्या काळात प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन रेल्वे लोकमान्य टिळक टर्मिनस, मुंबई आणि हुजूर साहेब नांदेड दरम्यान ४ विशेष रेल्वे गाड्या चालवणार.

तपशील खालीलप्रमाणे आहेत:

लोकमान्य टिळक टर्मिनस – हुजूर साहेब नांदेड – लोकमान्य टिळक टर्मिनस साप्ताहिक विशेष (४ सेवा) ट्रेन क्रमांक ०७६०४ ही विशेष गाडी २३.०९.२०२५ ते ३०.०९.२०२५ पर्यंत दर मंगळवारी लोकमान्य टिळक टर्मिनस, मुंबई येथून १६.३५ वाजता सुटेल आणि हुजूर साहेब नांदेड येथे दुसऱ्या दिवशी ०६.३० वाजता पोहोचेल.

ट्रेन क्रमांक ०७६०३ ही विशेष गाडी २२ .०९ .२०२५ ते २९.०९. २०२५ पर्यंत दर सोमवारी हुजूर साहेब नांदेड येथून २३.४५ वाजता सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस, मुंबई येथे दुसऱ्या दिवशी १३.४० वाजता पोहोचेल.

संरचना: एक वातानुकूलित प्रथम, दोन वातानुकूलित द्वितीय, सहा वातानुकूलित तृतीय, सहा शयनयान, चार सामान्य द्वितीय, दोन जनरेटर कार व एक पॅन्ट्री कार. थांबे: ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, नागरसोल, रोटेगाव, लासूर, औरंगाबाद, जालना, परतूर, सेलू, मानवत रोड, परभणी आणि पूर्णा. आरक्षण: विशेष गाडी क्रमांक ०७६०४ साठी आरक्षण २०.०९.२०२५ रोजी सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच www.irctc.co.in(http://www.irctc.co.in) या संकेतस्थळावर सुरू होईल.

आरक्षित नसलेल्या डब्यांची तिकिटे यूटीएस (UTS APP) द्वारे बुक करता येतील. यासाठी सुपरफास्ट मेल/एक्स्प्रेस गाड्यांप्रमाणेच सामान्य भाडे लागू राहील. तपशीलवार वेळापत्रक व थांब्यांसाठी www.enquiry.indianrail.gov.in(http://www.enquiry.indianrail.gov.in) या संकेतस्थळाला भेट द्या किंवा NTES ॲप डाउनलोड करा.

## चन्नबसवेश्वर महाविद्यालयात ७७ व्या मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ७७ वृक्षारोपण उपक्रम



**लातूर/प्रतिनिधी :** चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर येथे ७७ वा मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सदरील कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे सचिव आदरणीय श्री. भिमाशंकर देवनीकर यांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली. त्यानंतर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे ७७ वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला. या वृक्षारोपणात औषधी, फळझाडे व शोभिवंत अशी विविध झाडे लावण्यात आली. ७७ रोपे लावून मराठवाडा मुक्तीच्या ७७ वर्षांना अभिवादन करण्यात आले. रोपांची निगा राखण्याची जबाबदारी रा.से.यो. स्वयंसेवकांनी स्वीकारली.

यावेळी श्री. मठपती गुरुजी यांनी विद्यार्थ्यांना मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले असले तरी मराठवाडा भाग तत्कालीन हैदराबाद निजामशाहीच्या ताब्यात होता. निजामाच्या दडपशाहीविरुद्ध स्थानिक स्वातंत्र्यसैनिकांनी सशस्त्र लढा दिला. अखेर १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान भारतीय संघात विलीन झाले व मराठवाडा मुक्त झाला. हाच दिवस दरवर्षी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन म्हणून साजरा केला जातो. त्यांनी विद्यार्थ्यांना या लढ्यातील शूरवीरांचा त्याग स्मरणात ठेवून समाजकार्य व पर्यावरण संवर्धनात योगदान द्यावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमास संस्थेचे सचिव श्री. भिमाशंकर देवनीकर, विश्वस्त श्री. विजयकुमार मठपती, ॲड. गुरुनाथ मळभागे, प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी, प्राचार्य डॉ. संजय थोंटे, रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी प्रा. भीमाशंकर हुच्चे, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## आपले लोकप्रतिनिधी मराठवाड्याच्या प्रश्नांवर अत्यंत उदासीन – मजविप अध्यक्ष डॉ. सोमनाथ रोडे यांनी व्यक्त केली खंत



**लातूर/प्रतिनिधी :** मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या पुनर्स्थापनेसह मराठवाड्यातील सिंचन, उद्योग, कृषी क्षेत्रातील लाखो कोटींचा अनुशेष आदी प्रलंबित प्रश्नांवर आपण लोकशाही मार्गाने आक्रमक लढा उभारणार असून, मराठवाड्याच्या दुर्दैवाने इथल्या लोकप्रतिनिधींची मात्र विकासप्रश्नांवर अत्यंत अक्षम्य उदासीनता आहे. विधीमंडळात बसलेले हे मौनीबाबा मराठवाड्याला कैक योजने पिछाडीला घेऊन जात आहेत, अशा तिखट शब्दांत मराठवाडा जनता विकास परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे यांनी आपल्या सत्कारास उत्तर दिले.

लातूरकर नागरिकांच्या वतीने येथील हुतात्मा स्मारकास साक्षी ठेवून आयोजित जाहीर सत्कारास उत्तर देताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ॲड. भाई उदय गवारे होते. यावेळी कॉंग्रेस नेते मोईजभाई शेख यांच्या हस्ते डॉ. रोडे यांचा मजविपच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल, तर ॲड. व्यंकट बेद्रे यांच्या हस्ते प्रा. अर्जुन जाधव यांचा सचिवपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

गेली अनेक वर्षे मराठवाड्यात मंत्रीमंडळाची बैठक होत नाही, या वस्तुस्थितीकडे लक्ष वेधून डॉ. रोडे म्हणाले, आमचे रेल्वेचे प्रकल्प अर्धवट पडलेत. आरोग्याचे, उद्योगाचे प्रश्न प्रलंबित आहेत.

मराठवाड्यातील शेतकर्यांच्या आत्महत्या दिवसागणिक वाढतच चालल्या आहेत. शैक्षणिक अनुशेषाचा डोंगर वाढला आहे. पण लोकप्रतिनिधी तोंडात मिठाची गुळणी धरुन गप्प आहेत. कोणी बोलतच नाही. त्यामुळे त्यांच्यासह मराठवाड्यातील जनतेची अस्मिता जागी करण्याचे काम करावे लागेल. त्यासाठी आता तरुणांनी पुढे आले पाहिजे. प्रा. अर्जुन जाधव यांनीही सत्कारास यथोचित उत्तर दिले.

कॉंग्रेसनेते मोईजभाई शेख, ॲड. शिरसाट यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी मराठवाडा जनता विकास परिषदेच्या लातूर महानगर शाखेचे अध्यक्ष जयप्रकाश दगडे, जिल्हा शाखेचे सचिव पांडुरंग देडे, ॲड. उदय गवारे, अंनिसचे माधव बावगे, ॲड. विजय जाधव, विश्वनाथ कोळसुरे, डॉ. गणेश गोमारे, डॉ. बी.आर. पाटील, सुपर्ण जगताप, डॉ.मन्मथप्पा भातांब्रे, प्रा. बी.एस. पळसकर, बसवराज उटगे, कॉ. विश्वंभर भोसले, ॲड. गोविंद शिरसाट, ज्येष्ठ नागरिक संघाचे प्रकाश घादगिने आदींची उपस्थिती होती. सूत्रसंचलन व आभारप्रदर्शन ॲड. गवारे यांनी केले.

# धन्वंतरी आयुर्वेद मेडिकल कॉलेज उदगीर येथे बीव्हींजी Dial 108 रुग्णवाहिका तर्फे गुड समरीटन ॲपचे प्रशिक्षण

**उदगीर/प्रतिनिधी :** उदगीर येथील धन्वंतरी आयुर्वेद मेडिकल कॉलेज आणि चॅरिटेबल हॉस्पिटल मध्ये १६ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ३ ते ५ वाजेपर्यंत BVG महाराष्ट्र आपत्कालिन वैद्यकीय सेवेच्या लातूर जिल्हा व्यवस्थापक डॉ. संदीप राजहंस उपजिल्हा व्यवस्थापक श्रीकृष्ण दिंडगे आपत्कालिन वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनील शिंदे आणि आपत्कालिन सहाय्यक अब्रार शेख यांनी Dial 108 रुग्णवाहिकेची सेवा याबद्दल सविस्तर माहिती दिली.

तसेच Good Samaritan App बद्दल विस्तृत महिती PPT presentation व्दारे ८८ विद्यार्थी आणि विद्यार्थिनी आणि २२ शिक्षक आणि ईतर कर्मचारी यांना महिती दिली आणि ॲप डाऊनलोड कसे करायचे हे प्रत्यक्ष करुन दाखवले चांगला सामरिटन (Good Samaritan) म्हणजे अशी व्यक्ती जी कोणत्याही फायद्याची अपेक्षा





न करता किंवा हानी न पोहोचवता इतरांना मदत करते. विशेषतः, त्या व्यक्तीला कायदेशीर संरक्षण असते जे आपत्कालीन परिस्थितीत मदत करणाऱ्या व्यक्तींना कायदेशीर कारवाईपासून किंवा छळापासून वाचवते, जेणेकरून ते धोक्यात असलेल्या लोकांना मदत करण्यास घाबरणार नाहीत.

याच कार्यक्रमात उदगीर येथील डॉ. बालाजी बिरादार यांनी अत्यावश्यक सेवेत रुग्णांचा जीव वाचवण्यासाठी CPR Demonstration चे प्रत्याक्षिक आणि Emergency Medical System त्याचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले या कार्यक्रमाच्या वेळेस धन्वंतरी आयुर्वेद मेडिकल कॉलेज चे प्रिन्सिपॉल डॉ. दत्ता पाटिल आणि मुंढे आणि स्टाफ संपूर्ण कार्यक्रम संचालन करुन १०८ रुग्णवाहिका संपूर्ण स्टाफ आणि डॉ. बालाजी बिरादार यांचे आभार मानले आहेत आणि परिसिएशन केलें

कार्यक्रम यशस्वीतेसाठी लातूर जिल्हा व्यवस्थापक डॉ. संदीप राजहंस श्रीकृष्ण दींडगे आणि धन्वंतरी आयुर्वेद मेडिकल कॉलेज चे प्राचार्य डॉ दत्ता पाटिल सर आणि स्टाफ ,BVG चे श्री. विठ्ठल बोडखे यांनी परिश्रम घेतले तर प्रशिक्षण दिल्याबद्दल BVG चे मुख्य व्यवस्थापक डॉ. किशोर देव आणि डॉ. दिपक कुमार उके सर डॉ गजानन पुराणिक सर आणि लातूर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप ढेले सर तसेच चंद्रप्रकाश जगताप EMS समन्वयक यांनी अभिनंदन केले.



## मराठवाडा मुक्ती संग्रामदिनानिमित्त साहित्य भारतीच्यावतीने कवी संमेलन

**लातूर/प्रतिनिधी :** दि.१७ सप्टेंबर २०२५ रोजी सायं ठिक ५ वाजता अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती शाखा लातूरतर्फे निमंत्रिताचे कविसंमेलन संपन्न झाले.

या कवी संमेलनाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध गझलकार सुरेश गीर उर्फ सागर लातूरी होते तर प्रमुख निमंत्रित कवी म्हणून सिने अभिनेते तथा रंगकर्मी,कवी डॉ.संजय जमदाडे,ग्रामीण कवी नरसिंग इंगळे,साहित्य भारतीच्या जिल्हा कार्यकारिणी सदस्य कवियित्री डॉ.प्रणिता चाकूरकर,उषा भोसले,शहर कार्यकारिणी अध्यक्ष डॉ.नयन राजमाने,सुरेखा जमदाडे,प्रकाश घादगीने इत्यादींनी आपल्या कविता सादर केल्या.सूत्रसंचालन व आभार साहित्य भारती जिल्हा शाखेच्या अध्यक्ष सौ.शैलजा कारंडे यांनी मानले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे–भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# भाषा वाडमय मंडळातून दर्जेदार साहित्यिक निर्माण व्हावे.– ॲड. विजयकुमार कस्तुरे




कळंब (प्रतिनिधी)– शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात प्रतीवर्षीप्रमाणे मराठी, हिंदी आणि इंग्रजी विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष (२०२५–२६) भाषा वाडमय मंडळाची स्थापना करण्यात आली.

प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून बोलताना ज्येष्ठ साहित्यिक ॲड. विजयकुमार कस्तुरे, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात लेखकांची भूमिका महत्वाची आहे. नवोदितांनी मनापासून लिहिण्याची गरज असून त्यांनी सामाजिक जडणघडणीत योगदान दिले, असून भाषा ही माणसांना जोडणारी असली पाहिजे.

सुंदर अमुची माय मराठी मायबोली जगात साजली याप्रमाणे मराठी ही सौंदर्याने नटली अवघ्या विश्वामध्ये गाजली जगातल्या 'मी तू छी तू' सर्वात या त्यांच्या लघुअक्षरी कवितेमध्ये मानवी जीवनकाव्य सामावलेले दिसते असे स्पष्ट करून, त्या तरुच्या सावलीला चल सखे बोलू जराही नातेसंबंधावरील भावनिक कविता सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. आशयाची रचना सादर करून स्त्री जन्माचे स्वागत करण्याचे आवाहन केले, खरे म्हणजे स्त्री आज सर्वच क्षेत्रात जन्माचे असलेला महिलांचा सहभाग हे त्यांच्या आधुनिक काळाची नांदी ठरावी, असे कवितेतून महत्व पटवून दिले आहे. महाविद्यालयाच्या वाडमय मंडळातून विद्यार्थ्यांनी लेखन करीत राहिले पाहिजे, या भविष्यातील दर्जेदार साहित्यिक निर्माण व्हावेत, असे प्रतिपादन ड.विजयकुमार कस्तुरे (ज्येष्ठ साहित्यिक, चिखली जि. बुलढाणा) यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीत आणि संस्थेचे संस्थापक मोहेकर गुरुजींच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली.

वाडमय मंडळाचे उद्घाटक म्हणून उपस्थित प्रा.डॉ.संजय कांबळे (संस्थेचे संचालक तथा अधिसभा सदस्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर) म्हणाले, समाजजीवनात सर्व भाषा समान दर्जाच्या असून त्यात ही कोणतीही एक भाषा श्रेष्ठ असते, असे नाही. दैनंदिन सामाजिक व्यवहारासाठी हिंदी, मराठी अथवा इंग्रजी असो ती उपयुक्त ठरते. परंतु ती भाषा माणसा माणसातील संवाद जोपासणारी असली पाहिजे. लेखकांनी आपल्या भावना साहित्याच्या माध्यमातून व्यक्त करणे अपेक्षित असते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ. दादाराव गुंडरे यांनी सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.डॉ.दीपक सूर्यवंशी यांनी केले. तर आभारप्रदर्शन प्रा.नितीन अंकुशराव यांनी मानले. सदर कार्यक्रम डॉ.अशोकराव मोहेकर (सचिव, ज्ञान प्रसारक मंडळ येरमाळा) यांच्या मार्गदर्शनातून घेण्यात आला. व्यासपीठावर प्रमुख उपस्थितीमध्ये उपप्राचार्य डॉ. के.डी.जाधव, जयंत भोसले तर प्राचार्य डॉ.हेमंत भगवान उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या शब्दफुलोरा भित्तिपत्रकाचे विमोचन करण्यात आले.

यावेळी प्रा.डॉ.डी. एन.चिंते, प्रा.डॉ.बी.एस. सावंत, प्रा.जे.एच.काजी, प्रा.डॉ.एन.एम.अदाटे, प्रा.डॉ.बालाजी वाघमारे, प्रा.डॉ.के.डब्लू.पावडे, प्रा.डॉ.नामानंद साठे, प्रा.डॉ. अक्षय शिंदे, प्रा.डॉ.मीनाक्षी जाधव, प्रा.रोहिणी लोहकरे, प्रा. डॉ. वर्षा सरवदे, प्रा.राम दळवे, प्रा.सूरज गपाट, प्रा.शाहरुख शेख, प्रा.डॉ.समाधान चंदनशिवे, प्रा. तांबोळी, आदी उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी अधीक्षक हनुमंत जाधव, इकबाल शेख, संदीप सूर्यवंशी यांनी परिश्रम घेतले. यावेळी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# धाराशिव येथे 'फ्लेक्स स्कीम्स' कार्यशाळा व हिंदी दिवस कार्यक्रम संपन्न

धाराशिव (जिमाका):– मेरा युवा भारत जिल्हा धाराशिव व युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने वर्कशॉप ऑन फ्लेक्स स्कीम्स ही एकदिवसीय कार्यशाळा व हिंदी दिवस कार्यक्रमाचे आयोजन धाराशिव येथे करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन श्री.दत्ता चव्हाण (सहाय्यक आयुक्त,कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र) यांच्या हस्ते झाले.प्रमुख पाहुणे म्हणून श्री.पांडुरंग मोरे (जिल्हा उद्योकेंद्र धाराशिव) उपस्थित होते. मार्गदर्क वक्ते म्हणून श्री.केशव क्षीरसागर (रामकृष्ण परमहंस महाविद्यालय,धाराशिव) यांनी विद्यार्थ्यांना हिंदी भाषेचे महत्त्व स्पष्ट केले.

सह्याद्री अकॅडमीचे प्रा.सिद्धेश्वर मते यांनी प्रास्ताविक केले.यावेळी त्यांनी मेरा युवा भारत कार्यालयमार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

श्री.पांडुरंग मोरे यांनी उद्योग उभारणीसाठी आवश्यक कागदपत्रे,पीएमजीपी व सीएमजीपी योजना,मार्जिन मनी प्रोजेक्ट रिपोर्ट आणि उद्योजकतेसाठी लागणाऱ्या मार्गदर्शनाची माहिती दिली.

श्री.दत्ता चव्हाण यांनी राज्य शासनाच्या कौशल्य विकास व रोजगार संधी पोर्टलविषयी माहिती देऊन विविध क्षेत्रातील रोजगार संधी विद्यार्थ्यांसमोर मांडल्या.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी आवश्यक साहित्य वितरित करण्यात आले.कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी क्रीडा शिक्षक अजित रणदिवे (सह्याद्री अकॅडमी) तसेच मेरा युवा भारत कार्यालयाचे वैभव लांडगे,शंकर आगळे व सागर शित्रे यांनी परिश्रम घेतले.

# कळंब येथे जागतिक बांबू दिन साजरा



कळंब (प्रतिनिधी)– बांबू ही वेगाने वाढणारी वनस्पती असून ही गवत वर्णीय बाहुगुणी, बहु उपयोगी औषधी,ऑक्सीजन देणारी अशी वनस्पती आहे बांबूच्या शेतीपासून शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होतो याचा उपयोग प्रामुख्याने घर, फर्निचर, व विविध उपयोगी वस्तू तयार करण्यासाठी होतो संत ज्ञानेश्वर बालकाश्रम कळंब येथे महादेव महाराज अडसूळ यांनी मोठ्या प्रमाणावर बांबू वृक्ष लावले आहेत , १८ सप्टेंबर रोजी जागतिक बांबू दिनाच्या निमित्ताने आश्रमाच्या या परिसरात बांबू पूजन कार्यक्रम घेण्यात आला, सहशिक्षक व पत्रकार प्रदीप यादव यांच्या हस्ते बांबू पूजन करण्यात आले तसेच त्यांचा वाढ दिवसानिमित्त सत्कार करण्यात आला व त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या ,याप्रसंगी आश्रम संचालक महादेव महाराज अडसूळ, विठ्ठल माने, राजेंद्र बिक्कड, अमर चोंदे, सुरेश टेकाळे, अनिल यादव,प्रतीक गायकवाड,अशोक काटे, राजाराम त्रिमुखे,महादेव खराटे, डॉ, गिरीश कुलकर्णी, माधवसिंग राजपूत,बापू भंडारे, सोपान पवार बाळासाहेब कांबळे, बाळासाहेब कुलकर्णी,पोपट साळवे, विठ्ठल पुट्टेवाड,प्राचार्य महादेव गपाट, सरस्वती अडसूळ यांच्यासह कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# मोटरसायकलला पाठीमागून धडक, जखमी होवुन झाला मृत्यू

बेंबळी (प्रतिनिधी)– पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, मयत नामे– सिराज बशीर सय्यद, वय २२ वर्षे, रा.करजखेडा ता.जि. धाराशिव हे दि.०८.०९.२०२५ रोजी १९.०० ते १९.१५ वा. सु. मोटरसायकल क्र एमएच २५ बीबी २३१७ वरुन जात होते. दरम्यान राष्ट्रीय महामार्ग क्र ३६१ चे रोडवर करजखेडा येथे कार क्र एमएच २५ आर ९१८६ चा चालक आरोपी नामे– मुजमिल इसाक बागवान, रा. बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर यांनी त्याचे ताब्यातील कार ही हायगयी व निष्काळजीपणे चालवून सिराज सय्यद यांचे मोटरसायकलला पाठीमागून धडक दिली. या अपघातात सिराज सय्यद हे गंभीर जखमी होवून मयत झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे–अजमेर मुबारक मुल्ला, वय ५९ वर्षे, रा. उजणी ता. औसा जि. लातुर यांनी दि.१८.०९.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन बेंबळी पो ठाणे येथे भा.न्या. सं. कलम २८१, १०६(१) सह १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# कळंब च्या मुख्याधिकारी यांना शहरात स्वच्छता मोहीम राबवण्याचे उपविभागीय अधिकाऱ्यांचे आदेश ! कार्यालयास तात्काळ अहवाल सादर करण्याचे फार्मान?



कळंब(प्रतिनिधी)– सतत पडणाऱ्या पावसामुळे कळंब शहरात साथीच्या रोगांचे प्रमाण वाढले आहे. तापीचे रुग्ण वाढले आहेत डेंगू, मलेरिया सारखे गंभीर आजार डोक वर काढत आहेत, सर्दी खोकला ताप व विविध साथीच्या आजाराचे रुग्णांनी दवाखाने गच्च भरले आहेत. लहाना पासून ज्येष्ठ नागरिक देखील हैराण झाले आहेत.अशी तक्रार ड .मनोज चोंदे यांनी केली आहे . या तक्रारीच्या अनुषंगाने आपण तात्काळ शहरात स्वच्छता मोहीम राबवून या कार्यालयास तसा तात्काळ अहवाल सादर करावे असे आदेश उपविभागीय अधिकारी संजय पाटील यांनी कळंब नगर परिषदेच्या मुख्याधिकारी यांना एका पत्राद्वारे दिले आहेत .

कळंब शहरातील प्रत्येक नागरिका कडून शिक्षण करत घेतला जातो, मात्र शाळा महाविद्यालय परिसरात फवारणी करा असे नगरपरिषद प्रशासनास विनंती केली असता त्या भागात आमचा काही संबंध नाही असे उत्तरे दिले जात आहेत. व अशी आडमुठी भूमिका घेऊन नगरपरिषद प्रशासनाने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आणले आहे.

कळंब शहरामध्ये शासकीय कार्यालय आवारामध्ये शाळा महाविद्यालय परिसर तसेच शासकीय खुल्या जागेमध्ये मोठ्या प्रमाणावर गवत वाढले आहे व या गवतावर मोठ्या प्रमाणावर डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे हे डास चावल्याने ताप येणे डेंगू होणे मलेरिया होणे अंगाला फोड येणे एलर्जी होऊन अंग खाजवणे अशा समस्याचे रुग्ण वाढले आहेत.

असे गवत प्रामुख्याने लता मंगेशकर शाळा परिसर, महसूल कॉलनी तहसील कार्यालयाच्या आवारात तसेच जिल्हा परिषद कन्या शाळा, जिल्हा परिषद मुलांची शाळा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा यांचे आजूबाजूच्या सर्व पडीक शासकीय जागेत मोठ्या प्रमाणावर गवत वाढले आहे. आठवडी बाजार मैदान बस स्टँड परिसर, संत तुकाराम महाराज चौक ते देवी मंदिर कडे जाणाऱ्या रोडच्या दोन्ही बाजूने मोठ्या प्रमाणात गवत वाढले आहे इथेच रविवारचा भाजीपाल्याचा बाजार भरतो हाच भाजीपाला प्रत्येक घरात जातो या भागातील अस्वच्छतेमुळे रोगराई चे प्रमाण देखील वाढले आहे.

या भागात तन नाशक व कीटकनाशक फवारणी करणे अत्यंत आवश्यक आहे नगरपरिषद प्रत्यक भाजी वेक्रेता शेतकऱ्याला २० रुपये आकारणी भाजीपाला विक्री करण्यासाठी नगरपरिषद प्रशासनाकडून वसूल केले जातात तरी परंतु स्वच्छता मोहीम या भागात नियमित राबवली जात नाही.

तसेच संपूर्ण कळंब शहरामध्ये नालेसफाई करणे, सार्वजनिक ठिकाणी साचलेला कचरा साफ करणे,घरोघरी संडपण्यामध्ये अबेटिंग करणे, मच्छर चे प्रमाण रोखण्यासाठी कीटकनाशक फवारणी करणे व फॉगिंग धूर फवारणी करणे नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने नितांत गरजेचे आहे.

# शासनाने शेतकऱ्यांना अतिवृष्टीची सरसकट नुकसान भरपाई द्यावी – रामदास कोळगे

धाराशिव (प्रतिनिधी) –गेल्या काही दिवसापासून धाराशिव जिल्ह्यात पावसाने कहर केल्याने शेतकऱ्यांच्या खरीप पिकांचे आतोनात नुकसान झाले. सोयाबीन , मुग उडीद मका तुर साळ तीळ कापुस ऊस इत्यादी खरीप पिके या अतिवृष्टीत अक्षरशः वाहुन गेली या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांची अवस्था अतिशय बिकट झाल्याचे चित्र दिसून येत आहे त्यामुळे शासनाने तातडीने पावले उचलून शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा प्रदेश सचिव तथा माजी जिल्हा परिषद सदस्य रामदास कोळगे यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. श्री कोळगे यांनी पुढे म्हटले आहे की,जिल्हयासह इतर ठिकाणी पुढच्या दीड महिन्याच्या कालावधीत सुद्धा मोठ्या प्रमाणात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अन्य मंत्र्यांनीही लक्ष घालून धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना तातडीची नुकसान भरपाईची मदत मिळण्याची प्रक्रिया सुरु करावी जेणे करून शेतकर्यांच्या रब्बी हंगामाला तरी हातभार लागेल अशी मागणी श्री. कोळगे यांनी ई मेलद्वारे मुख्यमंत्र्यांकडे केली आहे .

# देवधानोरा आरती केंद्रामार्फत साधक दिक्षा सोहळा संपन्न

कळंब(प्रतिनिधी)– धार्मिक व आध्यात्मिक परंपरा जोपासणाऱ्या जगतगुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या मार्गदर्शनाखाली देवधानोरा आरती केंद्रामार्फत एक अत्यंत मंगलमय व भक्तिमय कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात दहा साधकांची ऑनलाइन साधक दिक्षा घेण्यात आली. या प्रसंगी संपूर्ण वातावरणात अध्यात्माची गोडी, भक्तिभाव व साधनेची प्रेरणा अनुभवायला मिळाली.

आरती केंद्र प्रमुख लक्ष्मण गायकवाड व संगीता गायकवाड यांनी यासाठी विशेष परिश्रम घेतले. दीर्घकाळापासून भक्तांच्या मनात निर्माण झालेला उत्साह या सोहळ्यात ओसंडून वाहताना दिसला. साधकांनी आपल्या जीवनात धर्म, अध्यात्म व साधनेचा स्वीकार करून एक नवा संकल्प घेतला.

या सोहळ्यात साधकांनी स्वतःच्या भावना व्यक्त केल्या. दिक्षेमुळे जीवनात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. जगतगुरु नरेंद्राचार्य महाराजांच्या शिकवणीमुळे आमचे जीवन अधिक अर्थपूर्ण होत आहे, अशी प्रतिक्रिया एका साधकाने दिली.

तर साधक वर्षा सावंत म्हणाल्या – आज मला साधक दिक्षा मिळाल्यामुळे माझं आयुष्य जणू नव्या अध्यायाला सुरुवात झाली आहे. आतापर्यंतचं आयुष्य संसारात गेलं, पण आता साधनेच्या मार्गाने चालतांना खऱ्या समाधानाचा अनुभव मिळेल, याची खात्री वाटते. जगतगुरु नरेंद्राचार्य महाराज यांच्या कृपेने हे शक्य झालं. आरती केंद्र प्रमुखांनी दिलेलं मार्गदर्शन आणि प्रेरणा यामुळेच आज हा सोहळा माझ्या जीवनात अविस्मरणीय ठरला आहे.

संपूर्ण सोहळ्यात गावकऱ्यांचा मोठा सहभाग होता. सर्वत्र मंगलध्वनी, आरत्या, भजनी मंडळांचे सूर आणि साधकांच्या डोळ्यांतून चमकणारा भक्तिभाव या सर्वामुळे देवधानोरा परिसरात अध्यात्मिक उर्जा निर्माण झाली.

या कार्यक्रमामुळे ग्रामस्थांमध्ये धार्मिक आणि सांस्कृतिक चैतन्याची नवी जागृती झाली असून, साधना हीच खरी संपत्ती हा संदेश अधिक प्रभावीपणे जनमानसात पोहोचला आहे.

**लातूर समाचार धाराशिव**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२–२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२–२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२–२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२–२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२–२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२–२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२–२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२–२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२–२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२–२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२–२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१–२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२–२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२–२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२–२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२–२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२–२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२–२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२
Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649